cmyk

## संपादकीय

### बदलती जीवनशैली, एआयचे आक्रमण

आजच्या वेगवान डिजिटल युगात मानवी नातेसंबंधांचे ताणेबाणे वेगाने बदलत आहेत. पूर्वी विवाहाकडे जन्माचा संबोध आणि एक पवित्र, न तुटणारा संस्कार म्हणून पाहिले जात होते. मात्र, आज २१ व्या शतकात ही विवाह संस्था एका अत्यंत गंभीर आणि नाजूक वळणावर येऊन ठेपली आहे. प्रख्यात लेखक आणि विचारवंत संदीप दास यांनी वर्तवलेले भाकीत आजच्या सामाजिक वास्तवावर थेट बोट ठेवते. त्यांच्या मते, २०४० पर्यंत पारंपारिक लग्नसंस्था पूर्णपणे कोलमडण्याच्या मार्गावर असेल.

दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–९५ | गुरूवार दि.२५ जून २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## थोडक्यात...

### ७ वर्षांच्या चिमुरडीवर ५५ वर्षीय नराधमाचा अत्याचार

डोंबिवली: पूर्व भागात एका ७ वर्षीय अल्पवयीन मुलीवर अत्याचार झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. याप्रकरणी कोळसेवाडी पोलिसांनी तत्परतेने कारवाई करत ५५ वर्षीय संशयित आरोपीला काही तासांतच ताब्यात घेतले आहे. गेल्या आठवड्याभरातील ही दुसरी दुर्दैवी घटना असल्याने स्थानिक नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, कोळसेवाडी पोलिस ठाण्याच्या हद्दीत राहणाऱ्या ५५ वर्षीय झुमय अली शेख याने घरात कोणी नसताना या चिमुरडीवर अत्याचार केले. पीडित मुलीला त्रास होऊ लागल्याने कुटुंबीयांनी विचारपूस केली, तेव्हा हा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. कुटुंबीयांनी तातडीने कोळसेवाडी पोलिस ठाण्यात धाव घेऊन तक्रार नोंदवली. वरिष्ठ पोलिस निरीक्षक हेमंत गुरव यांनी पीडित मुलीला व तिच्या कुटुंबाला धीर देत तात्काळ तपासाचे आदेश दिले. त्यानंतर गुन्हे शोध शाखेच्या पथकाने तांत्रिक तपासाच्या आधारे अवघ्या काही तासांतच संशयित आरोपी झुमय शेख याला अटक केली.

### राम मंदिर देणगी चोरी; १४ जणांवर ठपका

लखनौ: अयोध्येतील राम मंदिरातील कोट्यवधीच्या देणगी चोरी प्रकरणात एसआयटीने मंगळवारी तपास अहवाल राज्य सरकारकडे सुपूर्द केला. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, यात एफआयआर नोंदवण्याची आणि ट्रस्टची पुनर्रचना करण्याची शिफारस केली आहे. एखाद्या वरिष्ठ अधिकाऱ्याची मंदिराचे सीईओ म्हणून नियुक्ती करण्याचा सल्लाही देण्यात आला आहे. विशेष म्हणजे, एसआयटीने ट्रस्टचे सरचिटणीस चंपत राय, सदस्य डॉ. अनिल मिश्र, व्यवस्थापक गोपाल राव, व्यवस्थेशी संबंधित रामशंकर यादव टिन्नू यांच्यासह एकूण १४ जणांवर ठपका ठेवला असून, १५० लोकांच्या चौकशीचा तपशील आहे. तपासादरम्यान नोंदवण्यात आलेले अनेक जबाब ट्रस्टकडे उपलब्ध असलेल्या कागदपत्रांशी जुळत नाहीत, असे अहवालात म्हटले आहे.

### महिला सुरक्षेसाठी समिती स्थापन करणार–फडणवीस

मुंबई: काही कॉर्पोरेट कंपन्यांमध्ये महिलांवरील छळाच्या घटनांबाबत विशिष्ट कार्यपद्धती दिसून येत आहे. त्यामुळे विद्यमान कायदे व नियमांचे पुनरावलोकन करण्याची गरज निर्माण झाली आहे. यासाठी विधानसभा व विधानपरिषदेतील महिला सदस्यांची संयुक्त समिती स्थापन करण्यात येणार असून ती महिला सुरक्षेसंदर्भातील कायदे, नियम आणि घडलेल्या घटनांचा अभ्यास करून आवश्यक सुधारणा सुचवेल. राज्य शासन त्या शिफारशींची अंमलबजावणी करेल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषदेत दिली. नाशिक येथील टीसीएस कंपनीत महिला कर्मचाऱ्यांचे लैंगिक व मानसिक शोषण केल्याबाबत विधानपरिषद सदस्य चित्रा वाघ यांनी प्रश्न उपस्थित केला. या चर्चेत डॉ. नीलम गोऱ्हे, मनीषा कायंदे यांनी सहभाग घेतला. त्यावेळी ते बोलत होते.

### बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२४ जून २०२६**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ७१.०० क्विंटल | २,३९० | २,५०० | २,४१४ |
| ज्वारी/हायब्रिड: १८.०० क्विंटल | २,१०१ | २,८१० | २,४८४ |
| मका/लोकल: ४.०० क्विंटल | १,८१० | २,०५० | १,९३० |
| तूर: ०.५० क्विंटल | ७,३०० | ७,३०० | ७,३०० |
| उडीद: १.०० क्विंटल | ४,७०० | ४,७०० | ४,७०० |
| बाजरी: ३६.०० क्विंटल | २,०४१ | २,७५२ | २,३७२ |
| मुग: ४.०० क्विंटल | ७,००१ | ७,००१ | ७,००१ |
| सोयाबीन: १५.०० क्विंटल | ६,६५० | ६,६५० | ६,६५० |
| हरभरा: ०.५० क्विंटल | ५,२०१ | ५,२०१ | ५,२०१ |

**अधिकाऱ्यांच्या अनुपस्थितीवरून संताप**

# शेतकरी कर्जमाफी चर्चेदरम्यान विधानसभेत गदारोळ


मुंबई । प्रतिनिधी

**विधानसभेत शेतकरी कर्जमाफीवर चर्चा सुरू असताना कृषिमंत्री, त्याचप्रमाणे सहकार विभागाचे अधिकारी गॅलरीत हजर नव्हते. या मुद्द्यावर सत्ताधारी आणि विरोधी पक्षाच्या आमदारांनी जोरदार गदारोळ केला. त्यामुळे २० मिनिटांहून अधिक काळ विधानसभेतील कामकाज रोखून धरत दोन्ही बाजूच्या सदस्यांनी सरकारला जाब विचारला. त्यामुळे सभागृहात गदारोळ निर्माण झाला.**



विशेष म्हणजे सहकार विभागाच्या सचिवांना आणि अधिकाऱ्यांना विधानसभा अध्यक्षांनी हजर राहण्याच्या सूचना देऊनही ते सभागृहात न आल्याने या सगळ्यांकडून लेखी खुलासा मागवला जाईल, खुलासा समाधानकारक नसल्यास त्यांच्यावर कारवाई केली जाईल, असा इशारा तालिका अध्यक्ष समाधान अवताडे यांनी दिला आहे. विधानसभेतील गोंधळानंतर कृषीमंत्री दत्तात्रय भरणे धावत सभागृहात आले. कृषी, सहकार आणि संबंधित खात्यांचे अधिकाऱ्यांच्या अनुपस्थितीवरूनही आमदारांनी गोंधळ घातला. विधानसभेचे कामकाज १० मिनिटांसाठी तहकूब करा, अशी मागणी भाजपच्या हरिष पिंपळे यांनी करत प्रशासनाबरोबरच सरकारला घरचा आहेर दिला. पाऊस नाही, त्यामुळे पेरण्या होत ◀◀ पान २ वर

# मॉन्सूनने महाराष्ट्र व्यापला !



पुणे । प्रतिनिधी

**नैऋत्य मोसमी वारे अर्थात मॉन्सूनची वाटचाल वेगाने सुरु असून, बुधवारी (दि.२४) मॉन्सूनने संपूर्ण महाराष्ट्र व्यापला आहे. मॉन्सूनने मंगळवारी उत्तर मध्य महाराष्ट्र आणि उत्तर विदर्भातील काही भाग वगळता महाराष्ट्राच्या बहुतांश भागात मजल मारली होती. त्यानंतर बुधवारी मॉन्सूनने उत्तर मध्य महाराष्ट्र आणि उत्तर विदर्भाचा संपूर्ण भाग व्यापल्याचे हवामानशास्त्र विभागाने जाहीर केले आहे. त्यामुळे कोकण, मध्य महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाड्यातील काही जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्टचा इशारा हवामानशास्त्र विभागाने दिला आहे.**

कोकणातील पालघर, ठाणे, मुंबई, रत्नागिरी आणि रायगड जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी आज मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट असून विजांच्या कडकडाटासह जोरदार सरी कोसळण्याचा अंदाज आहे. तर सिंधुदुर्ग जिल्ह्यांत काही ठिकाणी मुसळधार पावसाचा इशारा हवामानशास्त्र विभागाने दिला आहे. मध्य महाराष्ट्रातील

### राज्यातील १४ जिल्ह्यांना मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट

जळगाव आणि नाशिक जिल्ह्यांत काही ठिकाणी मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्टचा इशारा असून नाशिक घाटमाथ्यावरही जोरदार सरींचा अंदाज आहे. तर धुळे, नंदुरबार, पुणे, अहिल्यानगर, सातारा, सांगली, सोलापूर आणि कोल्हापूर जिल्ह्यांत आज मेघगर्जना, विजांचा कडकडाटात वादळी वाऱ्यासह पावसाचा अंदाज असून पुणे घाटमाथ्यावर मात्र अतिमुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्टचा इशारा हवामानशास्त्र विभागाने दिला आहे. तसेच सातारा घाटमाथा आणि कोल्हापूर घाटमाथ्यावरही काही ठिकाणी जोरदार सरी कोसळण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. तर मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी आणि बीड जिल्ह्यांत तुरळक ठिकाणी मुसळधार पावसासह मेघगर्जनेचा ऑरेंज अलर्टचा इशारा देण्यात आला आहे. तर हिंगोली, नांदेड, लातूर आणि धाराशिव ◀◀ पान २ वर



## एक चूक भोवणार, बंडखोर खासदारांवर अपात्रतेची टांगती तलवार?

मुंबई । प्रतिनिधी

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षातील सहा खासदारांनी नुकताच एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केला असला, तरी त्यांच्या अपात्रतेचा मुद्दा आता पुन्हा चर्चेत आला आहे. या खासदारांवर कारवाई होऊ शकते, असा दावा ठाकरे गटाचे मुख्य प्रतोद अनिल देसाई यांनी केला आहे.

सहा खासदारांच्या पक्षांतरानंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हे 'ऑपरेशन ◀◀ पान २ वर

# हॉटेलमध्ये पिण्यायोग्य पाणी मोफत द्या, पाण्याच्या बाटलीचा आग्रह नको

**तुकाराम मुंढे यांचा आदेश**



मुंबई । प्रतिनिधी

राज्यातील सर्व हॉटेल्स, रेस्टॉरंट, धाबे, इटरीज आणि ज्या ठिकाणी अन्न प्रक्रिया केली जाते त्यांनी नियमांचे पालन करणं बंधनकारक आहे. त्याचे जर उल्लंघन केले तर त्यांना कुणीही वाचवू शकणार नाही, असा इशारा राज्याचे अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी दिला. तसेच हॉटेल्सनी ग्राहकांना पिण्यायोग्य आणि सुरक्षित पाणी हे मोफत देणे गरजेचे आहे, तसा बोर्ड त्यांनी समोर लावावा, अन्यथा कारवाई करण्यात येणार असल्याचा इशाराही त्यांनी दिला.

राज्यातील नागरिकांना सुरक्षित अन्न मिळावं यासाठी अन्न व औषध प्रशासनाने सुरक्षित अन्न, निरोगी महाराष्ट्र ही मोहीम राबवली जात आहे. त्यासाठी सर्वांनीच नियमांची अंमलबजावणी करावी, अन्यथा कारवाई करण्यात येईल असं तुकाराम मुंढे म्हणाले. राज्यातील हॉटेल्स, रेस्टॉरंट्स आणि इतर सर्व ठिकाणी ग्राहकांना पिण्यायोग्य आणि सुरक्षित पाणी हे मोफत उपलब्ध करण्यात यावं, बाटलीबंद पाणी देऊ नये, तसा बोर्ड त्यांनी समोर लावावा. जर एखाद्या ग्राहकाने या व्यतिरिक्त ◀◀ पान २ वर

# ठाकरे गटाच्या खासदारांची लोकसभा अध्यक्षांशी भेट

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

वसाळी अधिवेशनापूर्वी 'ऑपरेशन टायगर' प्रकरणावर लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला निर्णय घेण्याची शक्यता व्यक्त होत आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, तृणमूल काँग्रेस आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) यांच्या बंडखोर खासदारांबाबतची सुनावणी पूर्ण झाली असून अध्यक्षांकडून लवकरच फैसला होऊ शकतो.

शिवसेना ठाकरे गटातील सहा खासदारांनी लोकसभा अध्यक्षांची भेट घेऊन एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत सामील होण्याचे पत्र दिल्याची माहिती समोर आली आहे. या पार्श्वभूमीवर लोकसभा सचिवालयात कायदेशीर आणि घटनात्मक तज्ज्ञांशी चर्चा सुरू असल्याचे सांगितले जात आहे. तसेच डीएमके आणि टीएमसीच्या खासदारांच्या आसनव्यवस्थेबाबतही निर्णय होण्याची शक्यता आहे. ठाकरे गटाचे खासदार अरविंद सावंत यांनी लोकसभा अध्यक्षांशी भेटीनंतर प्रतिक्रिया देताना सांगितले की, एकत्रीकरण किंवा विलीनीकरणाचा ◀◀ पान २ वर

# घुले हत्या प्रकरणात खा.सोनवणे यांच्या मुलाचे नाव

**पोलिसांनी घेतला सौरव सोनवणेचा जबाब, चार दिवसानंतर विलास घुलेवर अंत्यसंस्कार**

केज । प्रतिनिधी

**तालुक्यातील टाकळी येथील विलास घुले हत्या प्रकरणात खा.बजरंग सोनवणे यांच्या अडचणीत वाढ झाली आहे. या हत्या प्रकरणात दिलेल्या जबाबात खासदारपुत्र सौरव सोनवणे याचे नाव समोर आल्यामुळे चर्चेला उधाण आले आहे. सौरव सोनवणे याचा या प्रकरणात पोलिसांनी जबाब नोंदवून घेतला. जबाबातील या उल्लेखामुळे तपास यंत्रणांसमोर अनेक नवे प्रश्न निर्माण झाले आहेत. या कारवाईनंतर रात्री उशिरा विलास घुले यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले .**

मिळालेल्या माहितीनुसार, खासदार बजरंग सोनवणे यांच्या सौरव सोनवणे या मुलाचे पुरवणी जबाबात नाव आले असल्याची माहिती पोलिस सूत्रांनी दिली आहे. तपासात काही निष्पन्न न झाल्यास नाव वगळले जाणार आहे. खासदार बजरंग सोनवणे यांच्या मुलाचे नाव पुरवणी जबाबात घेतल्यामुळे ◀◀ पान २ वर

### ठाणे प्रमुखांवर कारवाईची मागणी

केज पोलिसांनी प्रथम गुन्हा दाखल करण्यास विलंब लावला त्यामुळे संतप्त जमावाने प्रेत ठाण्यात ठेवले. त्यावेळी तेथील ठाणेप्रमुख अश्या संवेदनशील घटनेत मोबाईलवर हसून वार्तालाप करतानाचे व्हीडिओ फोटो व्हायरल झाले. या कर्मचाऱ्याला निलंबतीत करण्याची मागणी होत आहे. शिवाय अनावाने नावाच्या अधिकाऱ्याची बदली झालेली असताना ते कोणाच्या शिफारशीने याच ठिकाणी राहिले, असे प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

# अण्णा हजारे उपोषण करण्यावर ठाम

**● मुख्य माहिती आयुक्तांसोबतची चर्चाही निष्फळ**

अहिल्यानगर । प्रतिनिधी

माहिती अधिकार कायद्यात १२ जून २०२६ रोजी करण्यात आलेल्या नव्या नियमांविरोधात ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी उघडपणे आक्रमक भूमिका घेतली आहे. मुख्य माहिती आयुक्तांसोबत झालेली चर्चा समाधानकारक न ठरल्याने त्यांनी ५ जुलैपासून दिलेला उपोषणाचा इशारा कायम ठेवला आहे. उपोषणाच्या इशाऱ्यानंतर मुख्य माहिती आयुक्तांनी स्वतः राळेगणसिद्धी येथे जाऊन अण्णा हजारेंची भेट घेतली आणि नव्या नियमांबाबत चर्चा केली.



या बैठकीनंतर अण्णा हजारे यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, माहिती अधिकार हा जनतेच्या हितासाठी असायला हवा. मात्र सरकारने नव्या नियमांमधून अधिकाऱ्यांच्या हिताला प्राधान्य दिले आहे. हे लोकशाहीसाठी आणि पारदर्शक प्रशासनासाठी घातक आहे.

अण्णांनी सरकारसमोर ठाम भूमिका मांडत, ५ जूलैपूर्वी शासनाने आणखी एक बैठक बोलवावी आणि त्या बैठकीसाठी माहिती अधिकार क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींना निमंत्रित करावे, अशी मागणी केली आहे. त्या बैठकीत योग्य तो निर्णय झाल्यास पुढील भूमिका विचारात घेतली जाईल, अन्यथा ५ जुलैपासून ◀◀ पान २ वर

# खासगी मेडिकल कॉलेजची फी सरकारी कॉलेज इतकी ठेवता येणार नाही; सर्वोच्च न्यायालय

दिल्ली । प्रतिनिधी

देशातील वैद्यकीय शिक्षणाच्या वाढत्या खर्चाबाबत सुरू असलेल्या चर्चेदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवले आहे. खासगी मेडिकल कॉलेजांनी सरकारी कॉलेजांप्रमाणेच फी आकारावी, अशी अपेक्षा करता येणार नाही, असे स्पष्ट करत न्यायालयाने राजस्थानमधील खासगी वैद्यकीय महाविद्यालयांच्या फी संरचनेला आव्हान देणारी याचिका फेटाळून लावली. मात्र, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी वैद्यकीय शिक्षण



कितपत परवडणारे आहे, हा कायदेशीर मुद्दा भविष्यात विचारात घेतला जाऊ शकतो, असेही न्यायालयाने स्पष्ट केले. राजस्थानमधील खासगी मेडिकल कॉलेजांमध्ये वार्षिक ◀◀ पान २ वर

# पोलिसांच्या दिरंगाईमुळे चिघळले घुले हत्या प्रकरण




बीड । प्रतिनिधी

केज तालुक्यातील टाकळी येथील हॉटेल व्यवसाय विलास घुले या तरुणाचा जमावाने निर्धन पणे खून केला घटना घडल्यानंतर पोलिसांना याची माहिती मिळाल्यानंतर त्यांनी तात्काळ गुन्हा दाखल करून आरोपींचा शोध सुरू केला असता तर तालुक्यातील आणि जिल्ह्यातील वातावरण चिघळले नसते पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांनी प्रशिक्षणानंतर पदभार घेताच प्रत्यक्ष जाऊन परिस्थिती आटोक्यात आणली.

टाकळी येथील रहिवासी व हॉटेल व्यवसाय विलास घुले या तरुणाची कदमवाडी येथील तरुणाने हत्या केली. घटना घडल्यानंतर गंभीर जखमी असलेल्या घुले यास रुग्णालयामध्ये नेण्यात आले. त्याच्या भावाने पोलिसांना या घटनेची माहिती दिली होती. रुग्णालयात आणल्यानंतर पोलिसांनी याची दखल घ्यायला हवी होती. त्याचवेळी तात्काळ मृत्यूपूर्वीचा जवाब किंवा मयताच्या



कुटुंबीयांचा जबाब घेऊन गुन्हा दाखल केला असता तर वातावरण एवढे दूषित झाले नसते. पोलीस ठाण्याच्या प्रमुखांनी गुन्हा दाखल करण्यास विलंब लावल्यामुळे मयताचे कुटुंबीय आणि गावकरी संतप्त झाले आणि त्यांनी रास्ता रोको आंदोलन केले. यानंतर विलंबाने गुन्हा दाखल केला असाही आरोप केला जात आहे. विशेषतः त्याच वेळी जळगाववरून आरोपीवर गुन्हे दाखल झाले असते, तर राज्यभर एवढा रोष वाढला नसता. संतप्त नागरिकांनी मयत विलास घुले यांचा मृतदेह पोलीस ठाण्यामध्ये आणून ठेवला ही नामुष्की केवळ पोलिसांच्या दिरंगाईमुळेच आल्याचे दिसून येते. एक दिवस नव्हे तर तब्बल चार दिवस मृतदेह पोलीस ठाण्यामध्ये ठेवला गेला, ही गंभीर बाब मानवाधिकार कायद्यामध्ये येऊ शकते. पोलीस ठाण्यासमोर जमाव जमलेला असताना, तेथील अनवणे नामक ठाणे प्रमुख गंभीर परिस्थिती असतानाही दूरध्वनीवर हसत असल्याचे समोर आल्यानंतर संतप्त आंदोलकर्त्यांनी राग व्यक्त केला.या पोलिस अधिकाऱ्यांवर निलंबनाची ◀◀ पान २ वर

cmyk

अग्रलेख

# बदलती जीवनशैली, एआयचे आक्रमण

आजच्या वेगवान डिजिटल युगात मानवी नातेसंबंधांचे ताणेबाणे वेगाने बदलत आहेत. पूर्वी विवाहाकडे जन्माचा संबंध आणि एक पवित्र, न तुटणारा संस्कार म्हणून पाहिले जात होते. मात्र, आज २१ व्या शतकात ही विवाह संस्था एका अत्यंत गंभीर आणि नाजूक वळणावर येऊन ठेपली आहे. प्रख्यात लेखक आणि विचारवंत संदीप दास यांनी वर्तवलेले भाकीत आजच्या सामाजिक वास्तवावर थेट बोट ठेवते. त्यांच्या मते, २०४० पर्यंत पारंपरिक लग्नसंस्था पूर्णपणे कोलमडण्याच्या मार्गावर असेल. हा केवळ एक अंदाज नसून बदलत्या मानसिकतेचा आणि विज्ञानाचा आपल्या खाजगी आयुष्यावरील वाढत्या प्रभावाचा तो एक इशारा आहे.बदलत्या काळाची कठोर आकडेवारी कोणत्याही सामाजिक बदलाचा अभ्यास करताना भावनांपेक्षा वस्तुस्थितीकडे पाहणे अधिक गरजेचे असते.

जागतिक स्तरावरील नामांकित वित्तीय संस्था मॉर्गन स्टेनलीच्या एका महत्त्वपूर्ण अहवालानुसार, २०३० पर्यंत जगातील सुमारे ४५% महिला अविवाहित राहण्याची दाट शक्यता आहे. ही आकडेवारी स्पष्ट करते की, आता लग्न करणे हा महिलांसाठी एकमेव किंवा अनिवार्य पर्याय राहिलेला नाही.दुसरी महत्त्वाची आणि विचार करायला लावणारी आकडेवारी म्हणजे, आज जगभरात होणाऱ्या एकूण घटस्फोटांपैकी तब्बल ७०% पेक्षा जास्त घटस्फोट हे महिलांकडून पुढाकार घेऊन घेतले जात आहेत. शिक्षण, आर्थिक स्वावलंबन आणि करिअरच्या संधींमुळे स्त्रिया आता भावनिक आणि आर्थिकदृष्ट्या पुरुषांवर अवलंबून राहिलेल्या नाहीत. पूर्वीच्या काळी केवळ समाजाच्या भीतीपोटी किंवा आर्थिक परावलंबित्वामुळे स्त्रिया छळ आणि तडजोड सहन करूनही संसारात टिकून राहत असत. परंतु, आजचा आधुनिक समाज आणि स्त्री ही तडजोड करायला तयार नाही. सन्मान आणि आदर नसेल, तर नात्यातून सन्मानाने बाहेर पडणे तरुण पिढीला अधिक योग्य वाटते. मेट्रो शहरांमधील जवळपास ४०% तरुण तर लग्नाला आयुष्यातील महत्त्वाचा टप्पा मानण्यासच तयार नाहीत.

नात्यांचा पाया आदर आणि विश्वासभारतीय संस्कृतीमध्ये लग्नाला केवळ दोन व्यक्तींमधील करार मानले गेले नाही. आपल्या पौराणिक ग्रंथांमध्ये अशा अनेक कथा आहेत, ज्या आजच्या या स्वार्थी आणि क्षणभंगुर नात्यांच्या युगात मार्गदर्शक ठरू शकतात. सीता रामायणातील राम आणि सीतेचे नाते हे एकमेकांच्या हक्कांपेक्षा एकमेकांच्या आदरावर आधारित होते. श्रीरामांनी जेव्हा वनवासाचा निर्णय घेतला, तेव्हा सीतेने राजवैभवाचा त्याग करून पतीसोबत जाणे पसंत केले. हा निर्णय कोणत्याही कौटुंबिक दबावापोटी नव्हता, तर तो केवळ पतीबद्दलच्या आदर आणि प्रेमापोटी होता. आजच्या नात्यांमध्ये नेमका याच परस्पर आदराचा अभाव आहे. अहंकाराच्या लढाईत नाती क्षणात मोडीत निघत आहेत. सावित्रीने आपल्या बुद्धिमत्तेच्या आणि निष्ठेच्या जोरावर यमराजाशी संवाद साधून सत्यवानाचे प्राण परत मिळवले. ही कथा पती-पत्नीमधील आत्मिक जोडणीचे आणि संकटातही पाठीशी उभे राहण्याचे प्रतीक आहे. आज सोशल मीडियाच्या आभासी दुनियेत छोट्या गैरसमजांमुळे एकमेकांवरचा विश्वास उडतो, तिथे सावित्रीची ही निष्ठा आजच्या पिढीला अंतर्मुख करणारी आहे. राजा नल जेव्हा आपले सर्व वैभव जुगारात हरला आणि जंगलात भटकत होता, तेव्हा दमयंतीने त्याची साथ सोडली नाही. वाईट परिस्थितीत जोडीदाराचा हात घट्ट धरून ठेवणे हीच लग्नाची खरी कसोटी असते. आज आर्थिक चणचण किंवा मानसिक ताण आल्यास जोडपे लगेच विभक्त होण्याचा मार्ग निवडतात, जे या पौराणिक आदर्शांच्या पूर्णपणे विरुद्ध आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मानवी एकाकीपणाचा धोकासंदीप दास यांनी मांडलेला सर्वात धक्कादायक आणि विचार करायला लावणारा मुद्दा म्हणजे एआयचा मानवी नात्यांमधील हस्तक्षेप. त्यांच्या मते, २०४० पर्यंत माणसाच्या आयुष्यात दोन सोबती असू शकतात. एक मानवी जोडीदार आणि दुसरा एआय रोबोट. आजचा माणूस सोशल मीडियावर हजारो मित्रांशी जोडलेला असूनही वैयक्तिक आयुष्यात प्रचंड एकाकी आहे. कामगारांचे वाढते तास, मानसिक ताण आणि संवाद कमी झाल्यामुळे भविष्यात लोक मानवी नात्यांमधील गुंतागुंत आणि वाद टाळण्यासाठी एआय रोबोट्सचा आधार घेतील. हे रोबोट्स कधीही वाद घालत नाहीत, ते तुमच्या मूडनुसार वागतात आणि नेहमी उपलब्ध असतात. महाभारतात यक्षाने युधिष्ठिराला विचारले होते, ''मनुष्याचा खरा सोबती कोण?'' त्यावर युधिष्ठिराने उत्तर दिले होते, ''धैर्य हाच मनुष्याचा खरा सोबती.'' आजच्या युगात धैर्य आणि समजूतदारपणाची जागा यंत्रे घेत आहेत, ही मानवी संस्कृतीसाठी धोक्याची घंटा आहे. यंत्र कधीही मानवी भावनांची आणि प्रेमाची उब देऊ शकत नाही.

हार्वर्ड विद्यापीठाच्या एका जगप्रसिद्ध प्रदीर्घ संशोधनातून हे सिद्ध झाले आहे की, मानवी जीवनात दीर्घायुष्य आणि खऱ्या आनंदासाठी पैसा किंवा यश नाही, तर उत्तम नातेसंबंध सर्वात महत्त्वाचे असतात.लग्नसंस्था वाचवायची असेल, तर केवळ विवाह सोहळ्यांवर कोट्यवधी रुपये खर्च करून चालणार नाही, तर नात्याच्या गुणवत्तेवर काम करावे लागेल. त्यासाठी मैत्री, आदर आणि संवाद हे तीन खांब मजबूत असणे गरजेचे आहे. जोपर्यंत पती-पत्नी एकमेकांचे चांगले मित्र बनत नाहीत आणि एकमेकांच्या स्वातंत्र्याचा आदर करत नाहीत, तोपर्यंत कोणतेही नाते टिकू शकत नाही. पौराणिक काळातील उदाहरणे आणि आजचे आधुनिक विज्ञान दोन्ही एकाच निष्कर्षावर येतातनाते हे हक्कांपेक्षा कर्तव्यावर आणि अवाजवी अपेक्षांपेक्षा समजूतदारपणावर टिकते.

## छत्रपती राजश्री शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त ज्येष्ठ साहित्यिक उत्तम कांबळे सर यांच्या व्याख्यानाचे आयोजन

**बीड । प्रतिनिधी**

अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद बीड जिल्हा आयोजित क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षा निमित्त छत्रपती राजश्री शाहू महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून ज्येष्ठ साहित्यिक उत्तमराव कांबळे (नाशिक) यांच्या व्याख्यानाचे आयोजन शुक्रवार दि. २६ जून २०२६ रोजी सकाळी ११ : ३० वाजता हॉटेल नीलकमल नगर रोड बीड येथे करण्यात आले असून या व्याख्यानाच्या कार्यक्रमास शाहू - फुले - आंबेडकर प्रेमी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन कार्यक्रमाचे आयोजक महात्मा फुले समता परिषदेची प्रदेश सरचिटणीस तथा सिनेट सदस्य ॲड. सुभाष राऊत यांनी केले आहे.

११ एप्रिल २०२६ ते ११ एप्रिल २०२७ हे वर्ष समता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष मा. ना. छगनरावजी भुजबळ साहेब यांच्या संकल्पनेतून व माजी खा. समीरभाऊ भुजबळ, आ. पंकजभाऊ भुजबळ यांच्या पाठपुराव्यामुळे महाराष्ट्र शासनाने क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिराव फुले द्विशताब्दी जयंती वर्ष घोषित केलेले आहे. या अनुषंगाने वर्षभर विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. याचाच एक भाग म्हणून भिडे वाड्यातील क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी सुरू केलेल्या पहिल्या मुलींच्या शाळेचा चित्ररथ बीडमध्ये आणण्यात आला होता. आता शुक्रवार दिनांक २६ जून २०१६ रोजी सकाळी ११ : ३० वाजता हॉटेल नीलकमल नगर रोड बीड येथे ''छत्रपती राजश्री शाहू महाराजांचे आरक्षणाविषयी तत्कालीन धोरण व आजची परिस्थिती'' या विषयावर ज्येष्ठ साहित्यक उत्तमराव कांबळे (नाशिक) यांच्या व्याख्यान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस प्रा. सत्संग मुंडे, तुलसी समूहाचे अध्यक्ष प्रा. प्रदीप रोडे, समाजा परिषदेचे मराठवाडा विभागीय अध्यक्ष आबासाहेब खोत, साहित्यिक डॉ. सतीश साळुंके (बीड), परीट समाजाचे प्रदेश कार्याध्यक्ष गणेश जगताप, बीड नगरपालिकेच्या नगरसेविका सावित्री नितीन साखरे आदी मान्यवरांची उपस्थिती लागणार आहे. तरी या व्याख्यान कार्यक्रमास समता परिषदेचे पदाधिकारी, समता सैनिक, शाहू - फुले - आंबेडकर प्रेमी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन कार्यक्रमाचे आयोजक समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस तथा सिनेट सदस्य ॲड. सुभाष राऊत, समता परिषदेचे बीड जिल्हाध्यक्ष निखिल शिंदे, जिल्हा कार्याध्यक्ष अविनाश उगले, शहराध्यक्ष नितीन राऊत, राममेजर राऊत, नितीन साखरे, संतोष रासवे, जे. डी. शाह, बापू गाडेकर, दिगंबर नाईकनवरे, सावता काळे, जगन खेत्री, दत्ता बोडखे, कृष्णा शिंदे, मुकुंद शिनगारे, सचिन राऊत, दत्ता गोंदणे, शितलदास अडसुळे, धनंजय काळे, मंगेश जमदाडे, सचिन आडसुळे, अजय राऊत, स्वप्निल शिंदे, राजाभाऊ कटारे, महेश व्यवहारे, अजिंक्य सुरवसे, सुमंत राऊत, शरद विटकर, श्रीमती जयश्री आनंदराव मेश्राम (खेत्री) यांच्यासह समता परिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

## जिव्हाळ्याचा प्रश्न पुन्हा संदीपभैय्यांनी सभागृहात मांडला

### बीड शहराचे २० दिवसावरचे पाणी दोन दिवसांवर आणण्यासाठी १५ व्या वित्तची रक्कम महावितरणला वर्ग करा

मुंबई । प्रतिनिधी

योजना पूर्ण आणि पाणी उपलब्ध असतानाही केवळ महावितरणच्या थकबाकीमुळे नवीन वीज जोडणी मिळत नसल्याने शहराला २० दिवसाआड पाणी पुरवठा होत आहे. यामुळे शहरात पाणीटंचाई आहे. पाणीपुरवठा जर २ दिवसांवर आणायचं असेल तर बीड नगरपालिकेला आलेले १५ व्या वित्त आयोगाचे ४८ कोटी महावितरण कडे वळवले तर वीज जोडणी करुन पाणीप्रश्न सुटेल असे म्हणत शहराच्या जिव्हाळ्याचा विषय आ. संदीप क्षीरसागर यांनी पावसाळी अधिवेशनादरम्यान सभागृहात मांडला आहे.




बीड शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी पूर्वीची माजलगाव बॅकवॉटर योजना सुरू आहे. मात्र शहराची झपाट्याने होत असलेली वाढ ३ लाख लोकसंख्या यामुळे ही योजना पाणीपुरवठा करण्यासाठी अपुरी पडत आहे. त्यामुळे २०१७ मध्ये २४ टीएमएलटी ची नवीन अमृत अटल योजना मंजूर झाली. त्याचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे हस्ते झाले होते. ती योजना सध्या पूर्ण आहे. मात्र महावितरण कंपनीची थकबाकी असल्याने या योजनेला नवीन वीज कनेक्शन मिळत नाही. याबाबत वारंवार सभागृहात आवाज उठविला आहे. अजितदादा यांना ही याप्रकरणी भेटलो त्यांनी हे प्रश्न सोडविण्याचे आश्वासन दिले होते. त्यांनी ते सोडविले असते, पण दुर्दैवाने ते आज नाहीत. त्यामुळे पालकमंत्री सुनेत्राताई पवार यांच्याकडून अपेक्षा आहेत. तसेच यावर तोडगा काढण्यासाठी शासनाने जर नगरपालिकेला दिलेले १५ व्या वित्त आयोगाचे ४८ कोटी वळवून ते महावितरणला दिले तर थकबाकी निल होऊन नवीन वीज जोडणी मिळेल, यामुळे शहराला दोन दिवसांआड पाणी येईल असे आ.क्षीरसागर यांनी म्हटले आहे. यामुळे शासन आता यावर काय पाऊल उचलणार याकडे बीडकरांचे लक्ष लागले आहे.

## विधानसभेत आ.बबनराव लोणीकर यांचा आक्रमक पवित्रा; किड्स वर्ल्ड स्कूल प्रकरणी कठोर कारवाईची मागणी

**जालना । प्रतिनिधी**

**परतूर येथील किड्स वर्ल्ड इंग्लिश स्कूलमध्ये आयोजित करण्यात आलेल्या स्नेहसंमेलन कार्यक्रमातील कथित गंभीर प्रकारामुळे राज्यभर संतापाची लाट उसळली असून या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर देशद्रोहासह राष्ट्रीय सुरक्षा कायदा (रासुका) अंतर्गत कठोर कारवाई करण्यात यावी, तसेच बेकायदेशीररीत्या उभारलेली शाळेची इमारत तात्काळ पाडण्यात यावी, अशी आक्रमक मागणी आमदार बबनराव लोणीकर यांनी आज विधानसभेत औचित्याच्या मुद्द्याद्वारे केली.**

सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या व्हिडिओमध्ये विद्यार्थ्यांकडून ''गुस्ताख-ए-नबी की एक ही सजा, सर तन से जुदा'' या वादग्रस्त गाण्यावर नृत्य सादर करण्यात आल्याचा दावा करण्यात येत आहे. तसेच विद्यार्थ्यांच्या हातात तलवारी देण्यात आल्याचे आणि पाकिस्तानातील कुप्रसिद्ध अतिरेकी मुमताज कादरी याचे छायाचित्र कार्यक्रमादरम्यान प्रदर्शित करण्यात आल्याचेही समोर आले आहे. शैक्षणिक संस्था या विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रभक्ती, संविधानिक मूल्ये, सामाजिक सलोखा आणि राष्ट्रीय एकात्मता रुजविण्याची केंद्रे असताना अशा प्रकारच्या कथित घटना अत्यंत गंभीर असल्याचे नमस्कार बबनराव लोणीकर यांनी सांगितले. विधानसभेत बोलताना लोणीकर म्हणाले की, महाराष्ट्रातील कोणतीही शैक्षणिक संस्था विद्यार्थ्यांच्या मनात कट्टरता, द्वेष किंवा हिंसक विचारांचे बीजारोपण करण्याचे केंद्र बनू शकत नाही. या घटनेमुळे सार्वजनिक सुव्यवस्था, सामाजिक ऐक्य आणि राष्ट्रीय सुरक्षेबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. त्यामुळे संस्थाध्यक्ष, व्यवस्थापन समिती, मुख्याध्यापक, कार्यक्रम आयोजक आणि संबंधित जबाबदार व्यक्तींची भूमिका निश्चित करून त्यांच्यावर कठोरात कठोर कारवाई झाली पाहिजे, अशी मागणी देखील आमदार बबनराव लोणीकर यांनी यावेळी केली. यावेळी आमदार लोणीकर यांनी शाळेच्या प्रशासकीय आणि कायदेशीर बाबींवरही गंभीर प्रश्न उपस्थित केले. शाळेची मान्यता मसला ता. परतूर येथील पत्त्यावर असताना प्रत्यक्षात ती परतूर शहराच्या हद्दीत चालविली जात असल्याचा आरोप केला. तसेच ज्या जागेवर शाळा कार्यरत आहे ती जागा औकाफ बोर्डाशी संबंधित असल्याचा मुद्दाही त्यांनी उपस्थित केला. औकात बोर्डाच्या जागेवर अतिक्रमण करण्यात आले असून अतिक्रमण तात्काळ काढण्यात यावे अशी मागणी देखील आमदार लोणीकर यांनी यावेळी केली. याशिवाय शाळेच्या जागेच्या मालकी हक्काची कागदपत्रे, मंजूर बांधकाम नकाशा, बांधकाम परवानगी, पूर्णत्व प्रमाणपत्र, भोगवटा प्रमाणपत्र, कर आकारणीची नोंद यांसारखे महत्त्वाचे दस्तावेज उपलब्ध नसल्याचा दावा त्यांनी सभागृहात केला. हजेरीपटावर १५ शिक्षकांची नोंद असताना प्रत्यक्षात केवळ ७ शिक्षक कार्यरत असल्याची बाबही आमदार बबनराव लोणीकर यांनी निदर्शनास आणून दिली. आमदार लोणीकर यांनी आणखी एक गंभीर आरोप करताना सांगितले की, शाळेला राज्य मंडळाची मान्यता असताना पालकांची दिशाभूल करून सीबीएसई अभ्यासक्रम शिकविला जात असल्याची माहिती समोर आली आहे. याबाबत दुर्लक्ष करणाऱ्या तत्कालीन शिक्षण अधिकारी आणि संबंधित अधिकाऱ्यांवरही कायदेशीर कारवाई झाली पाहिजे असेही आमदार लोणीकर यावेळी म्हणाले. या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून शाळेच्या मान्यता प्रक्रिया, शिक्षक नियुक्त्या, विद्यार्थी नोंदी, आर्थिक व्यवहार आणि प्रत्यक्ष शैक्षणिक कार्यपद्धतीची तपासणी करण्यात यावी. नियमभंग, बनावट नोंदी, चुकीची माहिती किंवा मान्यता अटींचे उल्लंघन सिद्ध झाल्यास शाळेची मान्यता तात्काळ रद्द करण्यात यावी, अशी मागणीही आमदार लोणीकर यांनी केली. दरम्यान, या प्रकरणात दोषींवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा, राष्ट्रीय सुरक्षा कायद्यांतर्गत कारवाई करावी आणि परतूर नगरपरिषदेने बेकायदेशीर ठरवलेली शाळेची इमारत बुलडोझरद्वारे पाडावी, अशी मागणी करणारे सविस्तर पत्र राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांना पाठविल्याची माहितीही आमदार बबनराव लोणीकर यांनी दिली. ''महाराष्ट्रात राष्ट्रविरोधी, समाजात तेढ निर्माण करणाऱ्या आणि हिंसाचाराला खतपाणी घालणाऱ्या कोणत्याही कृत्याची गय केली जाणार नाही. विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळणाऱ्यांना कायद्याचा कठोर धडा शिकविण्यात यावा,'' अशी ठाम भूमिका आमदार बबनराव लोणीकर यांनी आज विधानसभेत मांडली.

## पान १ वरून...

### शेतकरी कर्जमाफी चर्चेदरम्यान

नाहीत. जनावरांना चारा नाही. याचे कुणालाच गांभीर्य नाही, असे सांगत पिंपळे आक्रमक झाले. याच मुद्द्यावर भाजपचे संजय कुटे यांनीही आक्रमक होत उबाठा सेनेचे कैलास पाटील, शरद पवार गटाचे रोहित पाटील यांच्यासह विरोधी सदस्यांनी रिकामी जागेत येऊन सभागृह तहकूबची मागणी केली. सहकार सचिवांना ४५ मिनिटांपूर्वी सभागृहात येऊन बसायला सांगितले होते. मला वाटते मंत्रालय ते विधानभवन हे अंतर ४५ मिनिटांचे नसावे. अधिकारी पायी आले तरी ४५ मिनिटे लागत नाहीत. गाडीने ५ मिनिटात यायला पाहिजे. रांगत आले तरी माझ्या अंदाजे ३० ते ३२ मिनिटात इथे यायला पाहिजे. माझ्या मते यावर एक समिती बसवून अंतर मोजून घेतले पाहिजे. अध्यक्षांनी आदेश देऊन ४५ मिनिटापेक्षा जास्त वेळ होऊनही अधिकारी येत नसतील तर प्रश्न अध्यक्षांचा नाही, तर तो विधान भवनाच्या आणि सदस्यांच्या अधिकारांचा असल्याचे सुधीर मुनगंटीवार यांनी सांगत कारवाईची मागणी केली.

----------

### मॉन्सूनने महाराष्ट्र व्यापला !

जिल्ह्यांत तुरळक ठिकाणी मध्यम पाऊस व विजांच्या कडकडाटाचा इशारा हवामानशास्त्र विभागाने वर्तवला आहे. तसेच विदर्भातील अकोला, बुलडाणा, वाशीम, भंडारा, गडचिरोली आणि वर्धा जिल्ह्यांत मेघगर्जनेसह हलका ते मध्यम पावसाचा अंदाज असून अमरावती, नागपूर, यवतमाळ, चंद्रपूर आणि गोंदिया जिल्ह्यांत काही ठिकाणी मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्टचा इशारा हवामानशास्त्र विभागाने दिला आहे. नैऋत्य मोसमी वारे अर्थात मॉन्सूनची वाटचाल वेगाने सुरु असून बुधवारी मॉन्सूनने उत्तर मध्य महाराष्ट्र आणि उत्तर विदर्भाचा संपूर्ण भाग व्यापला आहे, अशी माहिती हवामानशास्त्र विभागाने दिली आहे. मॉन्सूनची सीमा आज सुरत, इंदूर, मांडला, दाल्तनगंज, मोतीहारी भागातून जात आहे. तर पुढील दोन ते तीन दिवसात मॉन्सून गुजरात आणि मध्य प्रदेशच्या आणखी काही भागात प्रगती करण्याची शक्यता हवामानशास्त्र विभागाने वर्तवली आहे.

---------

### हॉटेलमध्ये पिण्यायोग्य पाणी मोफत

बाटलीबंद पाणी मागितलं तर त्याला ते द्यावं. जर याची अंमलबजावणी केली नाही तर कारवाई करण्यात येईल असा इशारा तुकाराम मुंडे यांनी दिला. ग्राहकांनी हॉटेलमध्ये आल्यानतंर त्यांना सुरक्षित पाणी, द्रवसाधन, टॉवेल, साबण देणं बंधनकारक आहे, त्यामुळे ग्राहकांचे आरोग्य सुरक्षित राहते, असे तुकाराम मुंढे म्हणाले. तुकाराम मुंढे म्हणाले की, ''अन्नात कुठेही भेसळ होऊ नये यासाठी काही पावले उचलण्यात येतात, त्याची जबाबदारी राज्याच्या एफडीए आयुक्तांवर असते. २३ जून रोजी एक आदेश काढण्यात आला आहे. त्यानुसार राज्यातील सर्व हॉटेल्स, रेस्टॉरंट्स आणि इटरिज यांनी नियम पाळणे बंधनकारक असेल. अन्न व सुरक्षा मानके यानुसार त्यांनी रजिस्ट्रेशन करावे. अन्न उत्पादन मानके, २०११ याच्यासह अनेक नियमांची अंमलबजावणी होणं गरजेचं आहे. तसेच शाळेच्या मुलांच्या सुरक्षेसाठी नियमांची अंमलबजावणी होणे आवश्यक आहे.'' राज्यात सुरक्षित अन्न, निरोगी महाराष्ट्र ही मोहीम राबवण्यात येत आहे. त्यामध्ये आतापर्यंत राबवलेल्या तपासण्यांमध्ये गंभीर तुटी आढळून आल्या. अस्वच्छ, अपायकारक परिस्थितीत अन्न तयार करणे, वापरलेल्या तेलामध्ये अन्न तयार करणे, अन्न पदार्थांचे कमी प्रतीचे पॅकेजिंग अशा अनेक गोष्टी दिसून आल्या.

**बदलीसाठी इंटरनॅशनल ड्रग लॉबीकडून २५० कोटी**

तुकाराम मुंढे हे अन्न व औषध प्रशासन विभागाचे (एफडीए) आयुक्त झाल्यापासून हे खाते देशभरात चर्चेत आले आहे. सरकारने या विभागाला गांभीर्याने घेतलेच नसल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी केला आहे. भेसळीने कॅन्सरच्या आजारात वाढ झाली आहे. माल तपासणीसाठी पाठवला जातो तो अद्यावत नाही असे आव्हाड म्हणाले. तुकाराम मुंढे यांच्या बदलीसाठी इंटरनॅशनल ड्रग लॉबीकडून २५० कोटी रुपये गोळा केल्याची धक्कादायक माहिती जितेंद्र आव्हाड यांनी विधानसभेत दिली.

**किचनमध्ये झुरळ, पाल दिसली तर खैर नाही; व्हेज-नॉनव्हेज वेगवेगळं ठेवा**

एफडीएने आखून दिलेल्या नियमानुसार या हॉटेल्सचे किचन असावे, त्यामध्ये अस्वच्छता दिसल्यास कुणालाही सोडणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला. आरोग्य विषयी नियमांचे पालन करताना काही नियम ठरलेले आहेत, त्या नियमांचे सर्वांनी पालन करणे बंधनकारक आहे. किचनमध्ये झुरळ, पाल दिसली तर खैर नाही; व्हेज-नॉनव्हेज वेगवेगळे ठेवा, असे ते म्हणाले. नियमांचे पालन केले नाही तर तुम्हाला कोणीच वाचवू शकणार नाही, असा कडक इशारा तुकाराम मुंढे यांनी दिला.

---------

### एक चूक भोवणार, बंडखोर खासदारांवर

टायगर' पूर्णपणे यशस्वी झाल्याचा दावा केला होता. ठाकरे गटाच्या ९ पैकी ६ खासदारांनी पक्ष सोडल्याने दोन-तृतीयांश संख्याबळ पूर्ण होत असल्याने कायदेशीर अडचण येणार नसल्याचे शिंदे गटाचे म्हणणे आहे. मात्र, या घडामोडींनंतर ठाकरे गटाचे लोकसभा गटनेते अरविंद सावंत आणि मुख्य प्रतोद अनिल देसाई यांनी लोकसभा अध्यक्षांची भेट घेतली. जवळपास ३५ मिनिटांच्या चर्चेनंतर देसाई यांनी मोठा दावा करत बंडखोर खासदारांनी दहाव्या अनुसूचीतील तरतुदींचे उल्लंघन केल्याचे म्हटले. अनिल देसाई म्हणाले की, ''दोन-तृतीयांश खासदारांनी वेगळा गट स्थापन केला असला तरी मूळ राजकीय पक्ष कोणत्याही दुसऱ्या पक्षात विलीन झालेला नाही. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) हा स्वतंत्र पक्ष अस्तित्वात आहे. त्यामुळे या खासदारांना पक्ष सोडून दुसऱ्या पक्षात जाण्याचा घटनात्मक अधिकार मिळत नाही.'' ते पुढे म्हणाले की, ''हे सर्व खासदार मशाल चिन्हावर निवडून आले आहेत आणि लोकसभेच्या नोंदींमध्ये ते शिवसेना ठाकरे पक्षाचे सदस्य म्हणून नोंदलेले आहेत. त्यामुळे त्यांच्यावर पक्षांतरबंदी कायद्याच्या सर्व तरतुदी लागू होतात.'' लोकसभा अध्यक्षांनीही संविधानातील दहाव्या अनुसूचीतील तरतुदींची नोंद घेतल्याचा दावा देसाई यांनी केला. त्यामुळे आता या प्रकरणात लोकसभा अध्यक्ष काय निर्णय घेतात, याकडे राज्याच्या राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. दरम्यान, शिंदे गटाने सर्व प्रक्रिया कायद्याच्या चौकटीत राहून पूर्ण केल्याचा दावा कायम ठेवला आहे. त्यामुळे सहा बंडखोर खासदारांच्या भवितव्याबाबतचा अंतिम निर्णय आता लोकसभा अध्यक्षांच्या भूमिकेवर अवलंबून असणार आहे.

-------------

### घुले हत्या प्रकरणात खा.सोनवणे

अडचणीत वाढ होणार आहे. बीडच्या केज तालुक्यातील टाकळी येथील विलास घुले हत्या प्रकरणाला नवे वळण लागले असून या हत्या प्रकरणामध्ये काल दिवसभर नातेवाईक तसेच सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिक केज पोलिस ठाण्यासमोर ठिय्या मांडून बसले होते. विलास घुले प्रकरणात बजरंग सोनवणे यांच्या मुलावर अनेक आरोप केले जात आहेत. मात्र बजरंग सोनवणे यांच्याकडून सांगण्यात आले आहे की, विनाकारण चुकीच्या पद्धतीने दबाव आणला जात असून आमचा त्या प्रकरणाशी कुठलाही संबंध नाही सीडीआर चेक करा, सीसीटीव्ही चेक करा, जे करायचे ते करा दोषी निघाल्यास कारवाई करा. मात्र या प्रकरणात अद्यापपर्यंत ९ आरोपींविरोधात गुन्हा दाखल झाला असून ८ आरोपींना ताब्यात घेण्यात आले आहे. मंगळवारी रात्री उशिरा विलास घुलेचा मृतदेह नातेवाईकांकडून ताब्यात घेण्यात आला. पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत हे पोलिस ठाण्यामध्ये तळ ठोकून होते. पोलिस अधीक्षकांच्या आश्वासनानंतर आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचा केज पोलिस ठाण्यासमोरील आंदोलकांना फोन गेल्यानंतर मृतदेह ताब्यात घेण्यात आला. या प्रकरणांमध्ये खासदार बजरंग सोनवणे यांच्या मुलाचे पुरवणी जबाबामध्ये नाव घेण्यात आले आहे. यामुळे बजरंग सोनवणे यांच्या अडचणीमध्ये वाढ होणार असल्यास बोलले जात आहे.

---------

### ठाकरे गटाच्या खासदारांची

प्रस्ताव दिला गेला असेल तर त्यावर निर्णय घेण्यापूर्वी आमची बाजू ऐकली जावी. ''सहा सदस्यांचा दोन तृतीयांश आकडा पूर्ण होत असला तरी आमचे काही मुद्दे आहेत. संविधानाचे उल्लंघन होईल असे कोणतेही पाऊल उचलू नये आणि न्याय्य भूमिका घ्यावी,'' असे सावंत म्हणाले. ठाकरे गटाचे खासदार अनिल देसाई यांनीही लोकसभा अध्यक्षांनी चर्चेसाठी बोलावल्याचे सांगितले. ''शिवसेना विधिमंडळ पक्षाचे नऊ सदस्य आहेत. जर एखाद्या गटाने स्वतंत्र व्यवस्था मागितली असेल, तर त्यासाठी दोन तृतीयांश सदस्यांची संमती आवश्यक आहे. त्यांनी नेमकी काय मागणी केली आहे, हे आम्हाला कळवावे,'' अशी मागणी त्यांनी केली. देसाई यांनी पुढे सांगितले की, विधिमंडळ पक्षाची जबाबदारी आमच्याकडे असून आमचे म्हणणे ऐकल्याशिवाय कोणताही निर्णय घेऊ नये. लोकसभा अध्यक्षांनी या प्रकरणात न्याय्य निर्णय देण्याचे आश्वासन दिल्याचेही त्यांनी नमूद केले. या घडामोडींमुळे पावसाळी अधिवेशनापूर्वी शिवसेनेतील खासदारांच्या राजकीय भूमिकेबाबत महत्त्वाचा निर्णय होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

-------------

### खासगी मेडिकल कॉलेजची फी सरकारी कॉलेज

शिक्षण शुल्क सुमारे १८.९ लाख ते २५ लाख रुपये इतके आहे. याविरोधात दाखल करण्यात आलेल्या याचिकेत असा युक्तिवाद करण्यात आला होता की, प्रवर्गासाठी वार्षिक उत्पन्नाची मर्यादा ८ लाख रुपये आहे. अशा परिस्थितीत लाखो रुपयांची फी भरणे अनेक विद्यार्थ्यांसाठी शक्य होत नाही. यामुळे आरक्षणाचा लाभ मिळूनही प्रत्यक्षात वैद्यकीय शिक्षण अनेक विद्यार्थ्यांच्या आवाक्याबाहेर जात असल्याचा दावा याचिकाकर्त्यांनी केला होता. न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्ना यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठाने सुनावणीदरम्यान स्पष्ट केले की, सरकारी आणि खासगी शैक्षणिक संस्थांची आर्थिक रचना पूर्णपणे वेगळी असते. न्यायालयाने म्हटले की, सरकारी महाविद्यालयांना सरकारकडून आर्थिक मदत मिळते, तर खासगी महाविद्यालये प्रामुख्याने विद्यार्थ्यांकडून मिळणाऱ्या शुल्कावर चालतात. त्यामुळे दोघांना एकसारखी फी लागू करणे योग्य ठरणार नाही.

**वाजवी फी घेण्याचा अधिकार**

सर्वोच्च न्यायालयाने पुढे नमूद केले की, शिक्षण संस्थांकडून कॅपिटेशन फी (देणगी) घेणे बेकायदेशीर आहे. मात्र, याचा अर्थ असा नाही की खासगी महाविद्यालयांना वाजवी शिक्षण शुल्क आकारण्याचा अधिकारच नसावा. न्यायालयाच्या मते, खासगी मेडिकल कॉलेजे देशातील वैद्यकीय शिक्षण व्यवस्थेत महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. त्यांच्यावर अनावश्यक निर्बंध आणल्यास डॉक्टर तयार होण्याच्या प्रक्रियेवर परिणाम होऊ शकतो. फी परवडत नसल्याबाबतच्या मुद्द्यावर न्यायालयाने विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती, अनुदान किंवा इतर आर्थिक सहाय्याच्या योजनांचा विचार करावा, असे सूचित केले.

------------

### अण्णा हजारे उपोषण

उपोषण सुरू होईल, असा स्पष्ट इशारा त्यांनी दिला.अपेक्षेप्रमाणे निर्णय झाला तर ठीक, अन्यथा आंदोलनाशिवाय पर्याय राहणार नाही १२ जून रोजी जाहीर करण्यात आलेल्या माहिती अधिकार नियमांबाबत आपण समाधानी नसल्याचे सांगत अण्णा हजारे म्हणाले की, आमच्या अपेक्षेप्रमाणे निर्णय झाला तर ठीक, अन्यथा आंदोलनाशिवाय पर्याय राहणार नाही. त्यामुळे राज्यातील माहिती अधिकार कार्यकर्ते आणि पारदर्शक प्रशासनासाठी काम करणाऱ्या संघटनांचे लक्ष आता शासनाच्या पुढील भूमिकेकडे लागले आहे.या बैठकीनंतर मुख्य माहिती आयुक्त पांडे यांनी प्रसारमाध्यमांना प्रतिक्रिया दिली. अण्णा हजारेंसोबत माहिती अधिकार नियमांबाबत सविस्तर आणि सकारात्मक चर्चा झाली आहे. मात्र, अण्णांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लिहिलेल्या पत्रावर अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार शासन आणि अण्णा हजारे यांच्याकडेच आहे. आम्ही सरकारचा अधिकृत निरोप घेऊन आलेलो नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. त्यामुळे आता सरकारच्या भूमिकेकडे लक्ष लागलं आहे.

----------

### पोलिसांच्या दिरंगाईमुळे चिघळले

कारवाई करण्यात यावी, अशी देखील मागणी करण्यात आली. मागील काही काळामध्ये जिल्ह्यातील अनेक ठाण्यांच्या प्रमुखांची खांदेपालट करण्यात आली. यामध्ये केज पोलीस ठाण्याच्या प्रमुखपदी बीडचे शितल कुमार बल्लाळ यांची नियुक्ती करण्यात आली होती, मात्र २४ तासातच बल्लाळ यांची केजला झालेली बदली रद्द करून ती बीड येथील शिवाजीनगर पोलीस ठाण्यात करण्यात आली तर अनवणे यांची झालेली बदली रद्द करून त्यांना तेच ठाणे दिले गेले. हे कशामुळे ? असा प्रश्न देखील उपस्थित केला जात आहे. कदाचित या प्रकरणात या बदलीचाही काहीतरी सहभाग असल्याची चर्चा होत आहे. पोलीस अधीक्षक यांचा पारदर्शक कारभार आहे, परंतु ती एकमेव बदली का रद्द झाली यासाठी कोणी शिफारस केली होती यावर देखील आता काही कार्यकर्ते बोलत आहेत. सद्या सुरू असलेल्या अधिवेनाच्या अनुषंगाने सभागृहामध्येही घुले हत्याकांडाची चर्चा झाली. त्यानंतर या हत्या प्रकरणाचा तपास एसआयटीकडे दिला गेला. या तपासात सर्वकाही बाहेर येईल. घटना कशामुळे घडली हे देखील सिद्ध होईल. मात्र परिस्थिती पाहता केज पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप करत कारवाई केली असती, तर हे प्रकरण चिघळले नसते.

-----------

cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....



थोडक्यात



## माजलगावात महेश नवमी निमित्ताने ५१ महिला व पुरुषांचे रक्तदान

माजलगाव । प्रतिनिधी

येथील माहेश्वरी समाजाच्या वतीने महेश नवमी निमित्ताने विविध सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.मंगळवार रोजी रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते. या रक्तदान शिबीरात ५१ महिला व पुरुषांना रक्त दान केले.

माजलगाव येथील राजस्थानी मंगल कार्यालयात सकाळी ९ वाजता रक्तदान शिबिराचे उद्घाटन डॉ राहुल लड्डा यांच्या हस्ते करण्यात आले तर या रक्तदान शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी अध्यक्षपद डॉ सुनंदा काकाणी यांनी सुचविले तर प्रमुख अतिथी म्हणून डॉ.महेश मालपाणी, डॉ दिनेश भुतडा, डॉ.नितीन मालपाणी, डॉ. करुना मोदाणी, डॉ.राधीका बजाज तसेच समाजातील विविध डॉक्टरांची उपस्थित होती. यावेळी ५१ रक्तदात्यांनी रक्तदान केले यावेळी माजलगाव ब्लड बँकचे कर्मचारी नवनाथ धापकर , प्रवीण गुंजकर , पोर्णिमा धापकर व सरिता माळी यांनी शिबिर यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले. यावेळी सचिव पुरुषोत्तम करवा , उपाध्यक्ष सत्यप्रकाश मालपाणी व ओम भुतडा , सहसचिव दगडू नावंदर , बालाप्रसाद करवा ,राजु मालपाणी ,बालाप्रसाद भुतडा , गणेश लोहिया यांनी यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले. या शिबिरात पुरुषांबरोबरच महिलांनी देखील मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवला.

## राहुल बडे यांचे निधन



दिंद्रुड : देवदहिफळ येथील राहुल रामराव बडे (वय ३२ वर्ष)यांचे अल्प आजाराने मंगळवारी सायंकाळी ५ वाजता छत्रपती संभाजीनगर येथील खाजगी रुग्णालयात दुःखद निधन झाले.तरूणवयात अकाली निधनाने बडे परिवारासह देवदहिफळ नगरीत या घटनेनंतर शोककळा पसरली.मयत राहुल यांच्या पार्थिवावर मंगळवारी रात्रौ ११ वा.शेतात अंत्यसंस्कार करण्यात आले.पश्चात आई, पत्नी,मुलगी, बहिण व भाऊ असा परिवार आहे.उद्योजक अमोल बडे यांचे ते ज्येष्ठ बंधू होत.

## आदिवासी मुलींच्या शासकीय वसतिगृहात प्रवेश सुरु

बीड : अंबाजोगाई शहरात शिक्षण घेत असलेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थिनींसाठी आदिवासी विकास विभागामार्फत चालविल्या जाणाऱ्या अंबाजोगाई येथील आदिवासी मुलींच्या शासकीय वसतिगृहात शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ साठीची प्रवेश प्रक्रिया अधिकृतपणे सुरू झाली आहे. इयत्ता आठवी आणि त्यापुढील वर्गात शिकणाऱ्या पात्र विद्यार्थिनींना या सुविधेचा लाभ घेता येणार आहे. तरी ग्रामीण भागातील गरजू व हुशार विद्यार्थिनींनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

आदिवासी विकास विभागाच्या वतीने मिळालेल्या माहितीनुसार, उच्च शिक्षणासाठी अंबाजोगाई शहरात येणाऱ्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थिनींची राहण्याची आणि भोजनाची गैरसोय होऊ नये, यासाठी हे वसतिगृह कार्यरत आहे. नव्या शैक्षणिक वर्षात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या सर्व पात्र विद्यार्थिनींनी वेळेत आपले अर्ज सादर करणे आवश्यक आहे. प्रवेशासाठी विद्यार्थिनींना www.swayam.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने अर्ज करावा लागणार आहे. ऑनलाईन अर्ज भरताना तांत्रिक अडचण आल्यास किंवा प्रवेशाबाबत काही शंका असल्यास विद्यार्थिनींनी थेट गृहपाल, आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृह, अंबाजोगाई यांच्याशी संपर्क साधावा. असेही कळविले आहे.

# मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहेमान यांची वडवणीतील आदर्श शाळांना भेट

वडवणी । प्रतिनिधी

बीड जिल्हा परिषदेचे कार्यतत्पर तथा कर्तव्यदक्ष मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहेमान यांनी काल दि.२४ बुधवार रोजी वडवणी येथे कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयात सुरु असलेल्या आदर्श शाळांमधील शिक्षकांच्या सायन्स डिजीटल लॅब व स्टेम लॅब प्रशिक्षणाला भेट देत शिक्षकांशी सविस्तर संवाद साधला. जवळपास दोन तास चाललेल्या या भेटीदरम्यान त्यांनी शिक्षकांना मार्गदर्शन करत विज्ञान विषयातील विविध उपक्रम, साहित्याचा प्रभावी वापर आणि विद्यार्थ्यांच्या वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या विकासाबाबत सखोल चर्चा केली. तसेच रस्त्याच्या सुरु असलेल्या कामांमुळे चारचाकी वाहन जात नसल्याने सीईओ यांच्यासह संपूर्ण प्रशासन चक्क दुचाकीवरुन गावातील जिल्हा परिषदेच्या रामबाग शाळेच्या पाहणीसाठी पोहोचले. त्याठिकाणीही त्यांनी पाहणी करुन शाळेसाठी आवश्यक त्या बाबींची पूर्तता करुत असा शब्द उपस्थितांना दिला.

कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयात सुरु असलेल्या आदर्श शाळांमधील शिक्षकांच्या सायन्स डिजीटल लॅब व स्टेम लॅब प्रशिक्षणाच्या भेटी दरम्यान मुख्य कार्यकारी अधिकारी रहेमान यांनी प्रत्येक आदर्श शाळेमध्ये सायन्स क्लब स्थापन करण्याची सूचना केली. डिजीटल लॅब व स्टेम लॅबमधील उपलब्ध साहित्याचा उपयोग केवळ संबंधित शाळेपुरता मर्यादित न ठेवता तालुक्यातील इतर शाळांमधील विद्यार्थ्यांनाही त्याचा लाभ मिळावा, यासाठी शिक्षकांनी नियोजन करावे, असे आवाहन त्यांनी केले. लॅबमधील आधुनिक व उपयुक्त साहित्याचा योग्य वापर, देखभाल आणि



### डिजीटल सायन्स लॅब, स्टेम लॅब प्रशिक्षणाचा घेतला आढावा

निगराणी ठेवून विद्यार्थ्यांना प्रयोगशील शिक्षण देण्यावर त्यांनी भर दिला. विज्ञान शिक्षण अधिक प्रभावी करण्यासाठी अशा सुविधा विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी महत्त्वपूर्ण ठरतील, असे त्यांनी सांगितले. तसेच यावेळी त्यांनी शाळांमधील विविध विकासकामांचा आढावा घेतला तसेच प्रयोगशाळा, शैक्षणिक सुविधा आणि विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असलेल्या सोयींचीही पाहणी केली व कमतरता जाणवलेल्या बाबींविषयी शाळा व्यवस्थापनाला सुचना दिल्या. दरम्यान, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रामबाग, वडवणी येथे नगरपंचायत वडवणीच्या माध्यमातून उभारण्यात आलेल्या नविन इमारतीची पाहणी करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी रहेमान यांनी स्वतः दुचाकीवरुन जावून शाळेला भेट दिली. या भेटीदरम्यान शाळेच्या नविन इमारतीमध्ये विद्यार्थ्यांसाठी वर्ग खोल्यांची कमतरता असल्याची माहिती नगराध्यक्ष शेषेराव जगताप, नगरसेवक नागेश डिगे तसेच शाळा प्रशासन व नगरपंचायत प्रशासनाच्या वतीने देण्यात आली. शाळेच्या दुसऱ्या मजल्यावर अतिरिक्त वर्ग खोल्यांच्या बांधकामासाठी निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी यावेळी करण्यात आली. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहेमान यांनी शाळेच्या गरजा लक्षात घेवून निधी उपलब्ध करुन देण्यासाठी सकारात्मक प्रतिसाद देत आश्वासन दिले. याप्रसंगी वडवणी तालुक्याचे नूतन गटविकास अधिकारी अशोक राठोड, गटशिक्षणाधिकारी राहुल भट्टी, वडवणी नगरपंचायतीचे मुख्याधिकारी पोपट निगळ, नगराध्यक्ष शेषेराव बाप्पू जगताप, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष बजरंग साबळे, युवा नेते आनंद काळे, नगरसेवक तथा सभापती नागेश डिगे, युवा नेते सतिश खोटे, संतोष आजबे, अभियंता रमेश बहिर, शिंदे मॅडम, लतीबे सर, घुगे सर, आळणे सर, टिपरे सर तसेच गटशिक्षणाधिकारी कार्यालयातील कर्मचारी उपस्थित होते. विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण, आधुनिक तंत्रज्ञानाधारित सुविधा आणि गुणवत्तापूर्ण शैक्षणिक वातावरण उपलब्ध करुन देण्यासाठी प्रशासनाकडून सुरु असलेले प्रयत्न निश्चितच कौतुकास्पद आहेत. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या अशा शाळा भेटी आणि शिक्षकांशी संवादामुळे शिक्षणाच्या गुणवत्तावाढीसाठी नवी प्रेरणा मिळत असल्याचे चित्र यावेळी दिसून आले.

## सुलतानपूर वस्ती शाळेची दयनिय अवस्था; विद्यार्थ्यांचे शिक्षण आणि आरोग्य धोक्यात

माजलगाव । प्रतिनिधी

सुलतानपूर वस्ती येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची अत्यंत दयनीय अवस्था समोर आली असून विद्यार्थ्यांना मूलभूत सुविधांपासून वंचित राहावे लागत आहे. शाळेच्या आवारात मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याने संपूर्ण परिसर तळ्याचे स्वरूप धारण करून बसला आहे. चिखल, घाण आणि साचलेल्या पाण्यामुळे विद्यार्थ्यांना शाळेत ये-जा करणेही अवघड झाले आहे.या गंभीर परिस्थितीची पाहणी संभाजी ब्रिगेड तालुका अध्यक्ष तुकाराम नावडकर यांनी केली. यावेळी अशोक थोरात (शालेय व्यवस्थापन समिती उपाध्यक्ष), अक्षय थोरात (ग्रामपंचायत सदस्य) आणि अजित लोखंडे उपस्थित होते.



पाहणीदरम्यान शाळेतील अनेक समस्या समोर आल्या. विद्यार्थ्यांसाठी पिण्याच्या पाण्याची योग्य व्यवस्था नाही. वर्गखोल्यांचे छत गळत असल्याने पावसाळ्यात विद्यार्थ्यांना वर्गात बसणे कठीण झाले आहे. बसण्याची व्यवस्था अपुरी असून फरशीही अनेक ठिकाणी निघालेली आहे. शाळेच्या परिसरात चिखल आणि साचलेल्या पाण्यामुळे विद्यार्थ्यांचा परिपाठ घेणे अशक्य झाले आहे. तसेच शौचालयाची सुविधा नसल्याने विद्यार्थ्यांना उघड्यावर जावे लागत असल्याची गंभीर बाब समोर आली.विशेष म्हणजे या समस्यांबाबत ग्रामपंचायत, ग्रामसेवक आणि सरपंच यांना वारंवार माहिती देऊनही कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आलेली नाही. उलट मी हे काम करणार नाही अशी भूमिका संबंधितांकडून घेतली जात असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

दरम्यान, तुकाराम नावडकर यांनी फेसबुक लाईव्हद्वारे शाळेची संपूर्ण परिस्थिती जनतेसमोर मांडली. शाळेच्या आवारात साचलेले पाणी, गळणारे वर्ग, शौचालयाचा अभाव, विद्यार्थ्यांची गैरसोय आणि प्रशासनाचे दुर्लक्ष याचे थेट प्रक्षेपण करून संबंधित यंत्रणांचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करण्यात आला.यावेळी बोलताना तुकाराम नावडकर म्हणाले, विद्यार्थ्यांना सुरक्षित आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे ही शासन व स्थानिक प्रशासनाची जबाबदारी आहे. मात्र सुलतानपूर वस्ती शाळेची अवस्था पाहता विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळ सुरू आहे. प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन सर्व समस्या सोडवाव्यात, अन्यथा संभाजी ब्रिगेडच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल.

शाळेतील साचलेल्या पाण्याचा तात्काळ निचरा करणे, शौचालय व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे, गळणाऱ्या वर्गखोल्यांची दुरुस्ती करणे आणि विद्यार्थ्यांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

पान ६ वरुन...

### लोणी-सांवगी उपसा

सध्या प्रकल्पाचं ९५ टक्के काम पूर्ण झाल्याचा दावा केला जात आहे, तरीही उरलेल्या ५ टक्क्यांतच खरी गोम दडलेली आहे. जेव्हा-जेव्हा चाचणी घेण्याची वेळ येते,तेव्हा काहीतरी तांत्रिक कारण समोर येतं आणि ही योजना पुन्हा एकदा वर्षभरासाठी लांबणीवर पडते.स्थानिक शेतकऱ्यांमध्ये आज तीव्र संताप पाहायला मिळतोय. त्यांच्या मते, प्रशासनाकडून दरवर्षी चाचणीबाबत मोठ्या घोषणा केल्या जातात. वृत्तपत्रांमधून पाणी सुटणार अशा बातम्या येतात, पण प्रत्यक्षात शेतात पाणी पोहोचण्याऐवजी केवळ फायलींचा प्रवास गतिमान होतो. जमिनीवर आजही काही ठिकाणी पंपगृहांची कामं,तर कुठे पाइपलाइनची जोडणी अर्धवट अवस्थेत आहे. हा केवळ कागदोपत्री गाजावाजा असून प्रशासनाने आता तरी गांभीर्याने ही योजना पूर्णत्वास न्यावी, अशी मागणी ग्रामस्थ करत आहेत.

यंदाचा पावसाळाही 'ट्रायल'च्या नावाखाली निघून जाऊ नये,

कार्यकारी अभियंत्यांच्या दाव्यानुसार ९५ टक्के काम पूर्ण झाले आहे. डिसेंबर २०२५ मध्ये तीन तासांची चाचणी घेतल्याचंही ते सांगतात.मात्र,जर ९५ टक्के काम झालं असेल,तर उरलेलं ५ टक्के काम पूर्ण व्हायला अजून किती पावसाळे लागणार? असा रोखठोक सवाल विचारला जात आहे.विद्युत जोडणी आणि अंतिम चाचणीसाठी लागणारी सज्जता अद्यापही पूर्ण क्षमतेने दिसत नसल्याने,यंदाचा पावसाळाही केवळ 'ट्रायल'च्या नावाखाली निघून जाऊ नये, हीच मोठी भीती आहे.

..तर आर्थिक क्रांती

या योजनेच्या महत्त्वाबाबत बोलताना आमदार प्रकाश सोळंके म्हणाले,की माजलगाव तालुका सातत्याने दुष्काळाच्या छायेत असतो. गोदावरीचे पाणी धरणात वळवल्यास भूजल पातळी वाढून मोठी आर्थिक क्रांती होईल.हे तालुक्याच्या विकासासाठी उचललेलं सर्वांत महत्त्वाचं पाऊल ठरेल.

या पावसाळ्यात चाचणी

कार्यकारी अभियंता सलिम शेख यांनी खात्री दिली आहे, की उपसा जलसिंचन योजनेचे काम ९५ टक्के पूर्ण झाले असून, येत्या पावसाळ्यात पूर्ण क्षमतेने चाचणी घेण्याचे आमचे नियोजन आहे. मागील डिसेंबरमध्ये आम्ही ३ तासांची चाचणी यशस्वीपणे पार पाडली आहे.

यंदा खरोखरच ही योजना यशस्वी झाली, तर माजलगावच्या मातीचा सुवास बदलून जाईल. १५ वर्षांचा हा प्रदीर्घ वनवास संपवून गोदावरीचं पाणी माजलगाव धरणात खेळू लागेल का, याकडे संपूर्ण तालुक्याचं लक्ष लागलं आहे.जर यंदाही कामात दिरंगाई झाली, तर मात्र ही योजना म्हणजे केवळ प्रशासकीय मृगजळ असल्याची भावना जनतेत प्रबळ होईल.

### चोरीस गेलेली ६८ हजारांची

अधीक्षक श्री. समीर शेख आणि उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. व्यंकटराम यांच्या मार्गदर्शनाखाली शिवाजीनगर पोलिसांनी तत्परतेने पावले उचलली. मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालय, बीड यांच्या आदेशानुसार, १२ जून २०२६ रोजी ही रक्कम फिर्यादी श्री. हिवराळे यांच्याकडे सुपूर्द करण्यात आली.ही कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करण्यात महिला पोलीस अंमलदार सीमा रोहिदास गायकवाड आणि रामलीला काशिनाथ गुंजाळ यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. तीन वर्षांनंतर आपली कष्टाची कमाई परत मिळाल्याने ज्येष्ठ नागरिक श्री. हिवराळे यांनी बीड पोलिसांचे मनःपूर्वक आभार मानले आहेत.

## सज्ञन दुर्जन असा भेद न करता माऊलीदादांनी सगळ्यांवर कृपा केली -श्री राम महाराज काजळे

बीड । प्रतिनिधी

श्री.माऊली महाराज दादा म्हणजे सज्जन दुर्जन, गरीब श्रीमंत शिक्षित अशिक्षित लहान मोठाअसा कसलाच फरक न करता आईप्रमाणे सर्वांनाच कृपा आशीर्वाद देणारी वासल्य मूर्ती होते त्यांनी जगताच्या उद्धारासाठीच संपूर्ण जीवन वेचले असे विचार ह भ प मृदंग महामेरू श्रीराम महाराज काजळे यांनी व्यक्त केले. श्री माऊली महाराज यांच्या २६ व्या पुण्यस्मरण सोहळ्यात ज्ञानेश्वरी पारायण व्यासपीठ अधिकारी प्रमुख म्हणून अनेक वर्षापासून त्यांनी सेवा सांभाळली असून पारायण दरम्यान ओव्यांचा संदर्भात थोडक्यात चिंतन मांडताना ते बोलत होते.



माऊलींनी आलेल्या प्रत्येक माणसांच्या पत्रात आनंद समाधान आणि आशीर्वादाचे दान दिले सदैव नामस्मरण आणि अखंड अन्नदान हे तत्व संपूर्ण आयुष्य पाळणे लाखो करोड भाविकांचा त्यांनी मार्ग दाखवून उद्धार केला सन्मार्गाला लावले असे सांगून आज सलग २६ वर्षे आपले गाव घरदार सोडून माऊलींच्या या पुण्यतिथी सोहळ्यात पारायण व आपल्या हातून घडील ती सेवा करण्यासाठी चाकरवाडी आवर्जून मुक्कामी राहतात माऊली हा त्यांचा ध्यास आणि माऊली हाच त्यांचा देव अशी भावना या माऊली भक्तांची असल्याचे श्री काजळे महाराज यांनी सांगितले व जो तुमच्या वर नितांत श्रद्धा भक्ती भाव ठेऊन त्यांच्या सांगितलेल्या वचनावर चालला त्याचा तर उद्धार झालाच पण जे चालू शकले नाहीत त्यांनाही माऊलीने तारले असल्याचे काजळे महाराज यांनी स्पष्ट केली आज त्यांच्याच पाऊलावर पाऊल ठेवून श्री महादेव महाराज तात्या व श्री नारायण महाराज भाऊ हा माऊलींचा भक्तीचा मळा अधिक जोमाने फूलविण्यासाठी व लोकांच्या कल्याणासाठी अहरनिश परिश्रम घेत असल्याचे सांगितले.

## मृग नक्षत्र कोरडे, जिल्ह्यातील शेतकऱ्यावर दुबार पेरणीचे संकट - बबनराव आंधळे

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यामध्ये मृग नक्षत्र पूर्णपणे कोरडे गेले आहे त्यामुळे बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या पूर्ण आशा आकांक्षावर पाणी फिरले गेले कापूस सोयाबीन तसेच इतर पिकावर अभूतपूर्व संकट कोसळले आहे यावर्षी पावसाने पाठ फिरवल्यामुळे शेतकऱ्याच्या चिंतेत वाढ झाली आहे बीड जिल्ह्यामध्ये सुरुवातीला थोडा पाऊस पडला आणि काही शेतकऱ्यांनी नेहमीप्रमाणे कापूस सोयाबीन व इतर पिकांच्या लागवडी केल्या आणि त्यानंतर पावसाने जी दडी मारली या लावलेल्या कापसाची उगवण क्षमता धोक्यात आली परिणामी शेतकऱ्यासमोर दुबार पेरणीचे संकट उभे राहिले असून समोर खर्चाचा डोंगर उभा राहिला आहे बीड जिल्हा कापूस व सोयाबीन पिकासाठी प्रसिद्ध जिल्हा म्हणून ओळखला जातो या पावसाच्या खंडामुळे आणि उशिरा लागवडीमुळे कापूस आणि सोयाबीनच्या गुणवत्तेवर परिणाम होण्याची चिन्हे दिसून येत आहेत म्हणूनच आज शेतकरी खूप चिंतेत आहे गतवर्षी पावसाने विक्रमी हजेरी लावत शेतकऱ्यांची तारांबळ उडवली होती काही बीड जिल्ह्याच्या भागात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्याचे अतोनात नुकसान झाले होते तर यावर्षी उलट परिस्थिती निर्माण झालेली आहे बळवाचा पाऊसही न आल्याने आणि मृग नक्षत्र कोरडे ठाक गेल्याने शेती शिवार ओसाड दिसू लागलेले आहेत त्यामुळे ग्रामीण भागात चिंतेचे सावट अधिक गडद झाले आहे २२ जून पासून आदरा नक्षत्राला प्रारंभ झालेला आहे या नक्षत्राकडे सर्व शेतकऱ्यांच्या नजरा लागलेल्या आहेत जर या नक्षत्रात पाऊस नाही पडला तर बीड जिल्ह्यावर दुष्काळाचे संकट येऊ शकते आणि पिण्याच्या पाण्याची भयंकर स्थिती निर्माण होऊ शकते असे मत ग्रामीण युवक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष बबनराव आंधळे यांनी एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे व्यक्त केले आहे बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झालेले आहे बीड जिल्ह्यातील मोठमोठी धरणे सोडून छोटे छोटे धरणे सर्वच १५ % ते ०% टक्क्यावर आली आहेत तरी राहिलेल्या तलावामध्ये पाणी उपसा न करण्याचे आदेश शासनाने द्यावेत असे या परिपत्रकाद्वारे ग्रामीण युवक संघटनेच्या वतीने आव्हान करण्यात येत आहे



## जाहिर प्रगटन

### तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात

जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं.१३०७/२०२६

ठाकर अप्पाराव बाबासाहेब विरुद्ध ग्रा.पं.कार्यालय, नेकनूर

पहा

१. ठाकर अप्पाराव बाबासाहेब रा.नेकनूर ता.जि.बीड (ह.मु.परळी वै.) उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्म धारक अनिकेत अप्पाराव ठाकर यांचा दिनांक २५/१०/२००८ रोजी जन्म झालेला असून त्यांचे जन्म नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरू आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प.कार्यालयास नेकनूर ता.बीड येथील जन्म-मृत्यू रजिस्ट्ररला घेवून जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य पुरूवा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे नेकनूर ता.जि.बीड येथील जन्म-मृत्यू रजिस्ट्ररला घेवून जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-२३/०६/२०२६ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले.

सदर प्रकरणात पुढील तारीख २३/०७/२०२६ ही आहे.

जाहिर प्रगटन दिले आहे.

स्वाक्षरित/-
तहसिलदार, बीड

## आदित्यच्या कॅम्पसमध्ये योगोत्सव, विद्यार्थ्यांमध्ये निरोगी जीवनशैलीचा जागर

### महाविद्यालयांतील हजारो विद्यार्थी, प्राध्यापकांना आर्ट ऑफ लिव्हिंगच्या साधकांचे मार्गदर्शन

बीड । प्रतिनिधी

योगामुळे केवळ शारीरिकच नव्हे, तर मानसिक आणि आध्यात्मिक आरोग्य सुदृढ राहण्यास मदत होते. आजच्या ताणतणावाच्या युगात विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबतच स्वतःला आरोग्याबाबत सुदृढ ठेवणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन आदित्य ग्रुपच्या संचालिका डॉ. आदिती सारडा यांनी केले.

बीड शहरातील आदित्य एज्युकेशन ग्रुप संचलित विविध महाविद्यालयांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय योग दिन आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा आणि संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या प्रेरणेने व मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.



या विशेष योग महोत्सवासाठी प्रख्यात योगगुरू व 'आर्ट ऑफ लिव्हिंग'चे ज्येष्ठ साधक विश्वनाथ गडकर, प्रमोद राख आणि योगशिक्षिका अंजली राख यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांनी कॅम्पसमध्ये उपस्थित शेकडो विद्यार्थ्यांना विविध योगासने, प्राणायाम आणि ध्यानधारणेचे थेट प्रात्यक्षिक करून दाखवले. केवळ एक दिवस योग न करता तो दैनंदिन जीवनशैलीचा भाग कसा बनवावा,याचे सोप्या भाषेत मार्गदर्शन त्यांनी केले.

विद्यार्थ्यांमध्ये आरोग्याविषयी सजगता निर्माण करण्यासाठी आयोजित या कार्यक्रमाला आदित्य ग्रुपच्या सर्वच शाखांमधील प्राचार्यांची प्रमुख उपस्थिती होती. यामध्ये डॉ. हिमांशू श्रीवास्तव (दंत महाविद्यालय), डॉ. विवेक कुलकर्णी (आयुर्वेद महाविद्यालय), प्रा. श्याम भुतडा (कृषी महाविद्यालय), डॉ. सतिश कचरे (जैवतंत्रज्ञान महाविद्यालय), डॉ. अमोल सानप (कृषी अभियांत्रिकी), प्रा. पुष्पराज राठोड (अन्न तंत्रज्ञान), प्रा. बालाजी बहिरवाळ (फिजिओथेरपी)

प्रा. विकास गर्जे (नर्सिंग महाविद्यालय), डॉ. पवार (बी. फार्मसी) व डॉ. रुपाली शिंदे (डी. फार्मसी) यांचा समावेश होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. मयुरी शिंदे यांनी केले,तर आभार प्रा. ढोबळे यांनी मानले. उपस्थितांनी शांतता मंत्राचे पठण केल्यानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

निरोगी भारत घडविण्याचा संकल्प

या सामूहिक योग साधना कार्यक्रमात सर्व महाविद्यालयांतील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. सर्वांनी एकाच वेळी योगासने करत योगाच्या माध्यमातून निरोगी व सुदृढ भारत घडवूया, असा सामूहिक संकल्प यावेळी केला.

cmyk

# शेती व्यवसाय करताना मृत्यू झाल्यास सानुग्रह अनुदान !

## शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी राज्य शासनामार्फत व्यापक उपाययोजना

मुंबई / प्रतिनिधी

शेतकरी सक्षमीकरण, कर्जमुक्ती, हवामान बदलाशी सामना, कृषी पायाभूत सुविधा, पीक विमा, कृषी यांत्रिकीकरण आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर यांसह विविध विषयांवर शासन व्यापक उपाययोजना राबवत असल्याचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी विधानसभेत सांगितले. राज्य शासनाने अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी ३६ हजार ५८५ कोटींची कर्जमुक्ती करण्याचा निर्णय घेतला आहे. याचा लाभ ५६ लाखांहून अधिक शेतकऱ्यांना होणार असून लोकप्रतिनिधींच्या सूचना विचारात घेऊन जास्तीत जास्त शेतकऱ्यांना दिलासा देत शेतकऱ्याचे हित साधणारे हे सरकार असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले.

विधानसभेत नियम २९३ अन्वये मांडण्यात आलेल्या प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देताना कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी राज्य शासन शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असल्याची ग्वाही दिली. कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना' जाहीर करण्यात आली आहे. ही राज्यातील आतापर्यंतची सर्वांत मोठी कर्जमाफी योजना ठरणार आहे. या योजनेअंतर्गत दोन लाख रुपयांपर्यंतच्या थकीत कर्जाची कर्जमुक्ती, नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांचे प्रोत्साहनपर अनुदान तसेच महात्मा जोतिराव फुले कर्जमुक्ती योजनेच्या लाभार्थ्यांसाठीही विशेष तरतुदी करण्यात



आल्या आहेत. या योजनेचा लाभ सुमारे ५६.२४ लाख शेतकऱ्यांना होणार असून ३६ हजार ५८५ कोटी रुपयांची कर्जमुक्ती देण्यात येणार आहे. पुढे बोलताना कृषी मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले की, खरीप २०२६ हंगामात एल निनोच्या संभाव्य परिणामांचा विचार करून शासनाने व्यापक पूर्वतयारी केली आहे. कमी पावसात तग धरणाऱ्या वाणांचे बियाणे उपलब्ध करून देणे, बीबीएफ तंत्रज्ञानाद्वारे पेरणीस प्रोत्साहन, शेततळी, सूक्ष्म सिंचन, मल्चिंग यांसारख्या उपाययोजनांवर भर देण्यात येत आहे. कृषी समृद्धी योजनेसाठी सन २०२६-२७ मध्ये दोन हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आहे. ड्रोन, शेतकरी सुविधा केंद्रे, जैविक शेती आणि कृषी पायाभूत सुविधा उभारणीस प्राधान्य दिले जाणार असल्याचेही सांगितले. पुढे बोलताना कृषी मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले की, शेती व्यवसाय करताना मृत्यू किंवा अपंगत्व आल्यास दिल्या जाणाऱ्या सानुग्रह अनुदान योजनेत शेतमजुरांचाही समावेश करण्याचा निर्णय घेण्यात आहे. महाडीबीटी पोर्टलमार्फत ही योजना ऑनलाइन राबविण्यात येणार असून शेतकऱ्यांना कार्यालयीन प्रक्रियेचा त्रास होणार नाही, पीएम किसान सन्मान निधी योजनेअंतर्गत राज्यातील १ कोटी १६ लाख शेतकऱ्यांना आतापर्यंत ४२ हजार ९०० कोटी रुपये वितरित करण्यात आले आहेत. नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेतून १४ हजार ८१६ कोटी रुपयांचे वितरण करण्यात आल्याचे सांगितले. कृषी मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले की, कापूस उत्पादकता वाढविण्यासाठी केंद्र पुरस्कृत विशेष अभियान राबविण्यात येत असून प्रति हेक्टर उत्पादन १० ते ११ क्विंटलवरून १५ ते १६ क्विंटलपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. यासाठी सन २०२६-२७ मध्ये १९१ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत खरीप २०२५ मध्ये १७.१७ लाख शेतकऱ्यांना १ हजार ५८२ कोटी रुपयांची नुकसानभरपाई मंजूर करण्यात आली आहे. त्यापैकी ९६ टक्के लाभार्थ्यांना रक्कम वितरित झाली आहे. फळपीक विमा योजनेअंतर्गतही नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना भरपाई देण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे सांगितले. राज्यात खरीप हंगामासाठी आवश्यकतेपेक्षा अधिक बियाणे आणि खतांचा साठा उपलब्ध असल्याची माहिती देताना कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले की, खतांच्या विक्रीत होणाऱ्या 'लिंकिंग' प्रकारांना आळा घालण्यासाठी कठोर निर्बंध लागू करण्यात आले आहे. कृषी निविष्ठांबाबत तक्रारींसाठी टोल फ्री क्रमांक आणि व्हॉट्सअ‍ॅप सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. दर्जाहीन व बनावट कृषी निविष्ठांविरोधात राज्यभरात विशेष मोहीम राबविण्यात येत असून ६९ हजारांहून अधिक विक्रेत्यांची तपासणी, ९७० मेट्रिक टन साठा जप्ती, १ हजार ८८ विक्रेत्यांचे परवाने निलंबित आणि ९४ गुन्ह्यांची नोंद करण्यात आली आहे. कृषी मंत्री दत्तात्रय भरणे पुढे बोलताना सांगितले की, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यात २१ जिल्ह्यांतील ७,२०१ गावांमध्ये सहा हजार कोटी रुपयांची भांडवली गुंतवणूक करण्यात येणार आहे. तसेच स्मार्ट प्रकल्पांतर्गत शेतकरी उत्पादक कंपन्या, गोदामे, कोल्ड स्टोरेज, अन्न प्रक्रिया युनिट्स आणि कृषी औजार बँका उभारण्यात येत असल्याचेही सांगितले.

# सुपर नेपियर चाऱ्याची लागवड करा; वर्षभर मिळेल मुबलक चारा!



शेतीला जोडधंदा म्हणून पशुपालन व्यवसाय मोठ्या प्रमाणावर केला जातो. पशुपालनामध्ये सगळ्यात जास्त चाऱ्याची आवश्यकता असते. कारण पशुपालकांचा सगळ्यात जास्त खर्च हा जनावरांच्या चारा व्यवस्थापनावर होतो. जनावरांना चाऱ्याची उपलब्धता व्हावी, यासाठी शेतकरी वेगवेगळ्या प्रकारच्या चाराची लागवड करतात. परंतु बऱ्याच शेतकऱ्यांची समस्या असते की त्यांचा पशुपालनाचा आवाका मोठा असतो. परंतु त्यामानाने त्यांच्याकडे उपलब्ध चारा लागवडीसाठीचे क्षेत्र कमी असते व असे पशुपालक हे चारा विकत घेऊन जनावरांची आहाराची गरज भागवतात.

सुपर नेपियर गवत : सुपर नेपियर गवत हे मूळचे थायलंड या देशातील असून, आपल्याकडे देखील मोठ्या प्रमाणात या गवताची लागवड केली जात आहे. पशुपालकामध्ये मोठ्या प्रमाणात लोकप्रिय असल्यामुळे, सुपर नेपिअर लागवडीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना चांगले उत्पादन मिळणे शक्य आहे. काही ठिकाणी जवळ-जवळ सात ते आठ एकर जमिनीत सुपर नेपियर लागवडीच्या माध्यमातून शेतकरी लाखो रुपये प्रति महिन्याला कमवत आहेत. विशेष म्हणजे कमी पाण्यात येणारे हे चारा पीक असून, दुष्काळग्रस्त पट्ट्यात देखील याची लागवड केली जाऊ शकते.वर्षभर मिळतो मुबलक चारा : पशुखाद्य म्हणून याचा खूप उपयोग होतो. सुपर नेपियर गवताचे उत्पादन हे वर्षभर सुरु राहत असल्यामुळे डेअरी उत्पादक शेतकऱ्यांना जनावरांसाठी हिरवा चारा वर्षभर उपलब्ध होतो. सुपर नेपियर गवत एकदा लागवड केल्यानंतर सात ते आठ वर्ष यापासून उत्पादन मिळत राहते. यामध्ये क्रमाक्रमाने त्याची कापणी केली जाते व दुसर्या बाजूने शेतात एक कलम टाकल्यानंतर दुसरे कलम तयार होत असते. सुपर नेपियर गवत १५ फूट उंच वाढते व यापासून चांगल्या प्रतीचा हिरवा आणि सुका चारा देखील मिळतो.सुपर नेपियर गवताला खर्च कमी असून मात्र त्या तुलनेत उत्पादन जास्त मिळते.

# आवक घटताच हळदीला भाववाढीची झळाळी; शेतकऱ्यांपेक्षा व्यापाऱ्यांनाच फायदा

सांगली / प्रतिनिधी

मार्केट यार्डात हळदीच्या दरात उसळी आल्याने बाजारपेठेत उत्साहाचे वातावरण आहे. मात्र, ही वाढ हंगामातील प्रमुख विक्रीचा कालावधी संपल्यानंतर झाल्याने त्याचा लाभ बहुतांश शेतकऱ्यांऐवजी साठा करून ठेवलेल्या व्यापाऱ्यांनाच मिळण्याची शक्यता व्यक्त होत आहे. सांगली मार्केट यार्डमध्ये राजापुरी हळदीला प्रतिक्विंटल १,५०० ते २,००० रुपयांची भाववाढ मिळत आहे. मात्र, ही वाढ हंगामातील प्रमुख विक्रीचा कालावधी संपल्यानंतर झाल्याने त्याचा लाभ बहुतांश शेतकऱ्यांऐवजी साठा करून ठेवलेल्या व्यापाऱ्यांनाच मिळण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

यंदा एप्रिलच्या सुरुवातीपासून पडत्या बाजारात हळदीची आवक सुरू झाली होती. खते, बी-बियाणे व इतर शेती खर्च भागविण्यासाठी अनेक शेतकऱ्यांना भावातच हळद विकावी लागली. हंगामाच्या प्रारंभी प्रतिक्विंटल १२ हजार ते १३ हजार ५०० रुपये दर मिळाला होता. त्यानंतर दरात सुमारे ७०० ते ८०० रुपयांची घट नोंदविण्यात आली. अनेक शेतकऱ्यांनी उपलब्ध होईल त्या भावात हळद विकली. मात्र, गेल्या आठवड्यापासून परिस्थिती बदलली असून, चांगल्या दर्जाच्या राजापुरी हळदीला १८ हजार ९०० ते २४ हजार रुपये दर मिळाला. पावसाळ्याला सुरुवात झाल्याने शेतकरी सध्या पेरणीत व्यस्त आहेत. त्यामुळे बाजारातील हळदीची आवक लक्षणीयरीत्या घटली आहे. एप्रिल व मे महिन्यात दररोज ४ ते ५ हजार क्विंटल हळद बाजारात दाखल होत होती. मात्र, गेल्या आठवड्यात ही आवक सुमारे दोन हजार क्विंटलवर आली आहे. आवक कमी झाल्यामुळेच दरात वाढ झाल्याचे व्यापारी आणि जाणकारांचे मत आहे. खरिपाच्या पेरणीचे दिवस जवळ आल्याने शेतकऱ्यांना पैशांची गरज होती. आर्थिक गरज भागविण्यासाठी बहुतांश शेतकऱ्यांनी मे आणि जूनच्या पहिल्या दोन आठवड्यांत पडत्या भावात हळद विकून टाकली. आता बाजारात दर वाढले असले तरी अनेक शेतकऱ्यांकडे विक्रीसाठी माल नाही. परिणामी, शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले असून, हळदीची गोदामात साठवणूक करणाऱ्या व्यापाऱ्यांना मोठा फायदा झाला आहे.



# तिप्पट उत्पन्न आणि चवीला मधुर जपानी रेड डायमंड पेरुची शेती

रेड डायमंड पेरु शेतकऱ्यांमध्ये खूप लोकप्रिय आहे. या पेरुचा दर खूप जास्त असून, बाजारात १०० ते १५० रुपये किलोने विकला जातो. हा पेरु त्याच्यातील चव आणि गोडवा यासाठी खूप लोकप्रिय आहे. या पेरुची लागवड करून शेतकरी काही वर्षांत श्रीमंत होऊ शकतात.

भारतातील बहुतेक शेतकरी पारंपारिक शेतीऐवजी अपारंपारिक पिकांची लागवड करत आहेत. या प्रयत्नात ते यशस्वी होत आहेत आणि चांगली कमाई करत आहेत. बहुतांश शेतकरी विविध प्रकारच्या फळांची लागवड करतात. आजकाल रेड डायमंड पेरू देशातील शेतकऱ्यांमध्ये खूप लोकप्रिय आहे. जपानी रेड डायमंड पेरुचा दर खूप जास्त आहे. देशातील अनेक राज्यांमध्ये या जातीच्या पेरुची लागवड करण्यास सुरुवात केली असून त्यातून त्यांना चांगले उत्पन्न मिळत आहे.

योग्य हवामान आणि माती : रेड डायमंड पेरुच्या लागवडीसाठी १० अंश ते ४२ अंश सेल्सिअस तापमान योग्य मानले जाते. परंतु तापमान थोडे कमी झाले तरी त्याचा उत्पादनावर परिणाम होत नाही. या जातीच्या पेरुच्या लागवडीसाठी काळी किंवा वालुकामय चिकणमाती चांगली



मानली जाते, तसेच जमिनीचा (सामू) ७ ते ८ असावी.

रोप लागवड आणि रोपातील अंतर : जपानी रेड डायमंड पेरुची रोपे लावताना तुम्हाला त्यांच्यामधील जागेची विशेष काळजी घ्यावी लागेल. एका ओळीपासून दुसर्या ओळीपर्यंतचे अंतर सुमारे ८ फूट ठेवावे आणि रोपापासून रोपापर्यंतचे अंतर ६ फूट ठेवावे. चांगल्या वाढीसाठी शेतकर्यांना वर्षातून दोनदा रोपांची छाटणी करावी लागते. जेव्हा त्याचे फळ चिकूच्या आकाराचे होते तेव्हा आपण ते फळ पिशवी किंवा वर्तमानपत्राने झाकून ठेवावे. असे केल्याने पेरू पिकण्याची प्रक्रिया सुधारते आणि फळांवर डाग दिसत नाहीत.

खत आणि सिंचन : रेड डायमंड पेरुची लागवड करण्यासाठी शेतकर्यांनी शेणखत आणि गांडूळखत यांचा पिकांमध्ये वापर करावा. याशिवाय, एनपीके सल्फर, मॅग्नेशियम सल्फेट, कॅल्शियम नायट्रेट आणि बोरॉन यासारखी रासायनिक खते वापरू शकता. रेड डायमंड पेरुच्या झाडांना पाणी देण्यासाठी शेतकरी ठिबक सिंचन पद्धतीचा वापर करतात. याशिवाय वेळोवेळी सामान्य सिंचन देखील आवश्यक आहे.

रेड डायमंड पेरू पासून होणारी कमाई

जपानी रेड डायमंड पेरू सामान्य पेरुसारखा दिसतो. पण आतून तो टरबूजासारखा लाल असतो आणि बाहेरून तो नाशपातीसारखा गोड असतो. बाजारपेठेत स्थानिक पेरुचा भाव ५० ते ६० रुपये प्रति किलो तर जपानी रेड डायमंड पेरू १०० ते १५० रुपये किलो दराने विकला जातो. या पेरुची लागवड करून शेतकरी सामान्य पेरूपेक्षा ३ पट अधिक उत्पन्न मिळवू शकतात. या जातीच्या पेरुची लागवड करण्यासाठी खर्च सुद्धा कमी येतो.




### महत्वाच्या घटना

१५०५ : मुघल सम्राट हुमायू यांनी आपला पुत्र अकबर यांना आपला वारीसदार म्हणून घोषित केलं.
१६३३ : गॅलेलिओ गॅलिली याने पोपच्या दबावाखाली पृथ्वी हाच सूर्यमालेचा केंद्रबिंदू आहे असे कबूल केले.
१७५७ : प्लासीची लढाई सुरू झाली.
१८९७ : चार्ल्स रँड याला दामोदर हरी चाफेकर यांनी पुण्यातील जुलमाचा वचपा म्हणून बंदुकीने गोळ्या घातल्या.
१९०८ : 'देशाचे दुर्दैव' हा जहाल अग्रलेख लिहिल्याबद्दल लोकमान्य टिळकांना ६ वर्षे काळ्या पाण्याची शिक्षा
१९३१ : फ़र्ग्युसन महाविद्यालयाच्या ग्रंथालयात वासुदेव बळवंत गोगटे यांनी सर जॉन हॉटसन या मुंबई प्रांताच्या राज्यपालावर गोळया झाडल्या. हॉटसन वाचला. पुढे हे 'हॉटसन' गोगटे पुण्याचे महापौर बनले.
१९३९ : नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी राष्ट्रीय काँग्रेस पक्षापासून अलिप्त होऊन स्वता:च्या फॉरवर्ड ब्लॉक या राजनीतिक पक्षाची स्थापना केली.
१९४० : दुसरे महायुद्ध फ्रान्सने जर्मनीसमोर शरणागती पत्करली.
१९४० : नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी काँग्रेसमधुन बाहेर पडुन ऑल इंडिया फॉरवर्ड ब्लॉक या पक्षाची स्थापना केली.
१९४१ : नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी सावरकर सदन येथे स्वातंत्र्यवीर सावरकर यांची भेट घेतली.
१९९३ : वेषभूषाकार भानू अथैय्या यांना अमेरिकेतील ॲकेडमी ऑफ मोशन पिक्चर आर्ट अँड सायन्स या संघटनेचे सदस्यत्त्व देण्यात आले. या सदस्यांना प्रतिष्ठेच्या ऑस्कर पुरस्काराबाबत मत देण्याचा अधिकार आहे.
१९९४ : महाराष्ट्र सरकारचे महिलाविषयक धोरण जाहीर झाले. त्याद्वारे सरकारी व निमसरकारी नोकर्यात महिलांना ३० टक्के आरक्षण.
२००१ : जागतिक जलतरण स्पर्धेत ऑस्ट्रेलियाचा मातब्बर जलतरणपटू इयान थॉर्प याने आपला पहिला विश्वविक्रम केला. त्याने ४०० मीटर फ्रीस्टाईल शर्यत ३ मिनिटे ४०.१७ सेकंद अशा विक्रमी वेळात जिंकली.
२००७ : अंतराळवीर सुनिता विल्यम यांनी सुमारे १९४ दिवस १८ तास पूर्ण करून सर्वाधिक काळ अंतराळात राहून पृथ्वीवर परत आले.
२०१६ : भारतीय अंतराळ संस्था इस्रो ने जागतिक विश्वविक्रम रचत आपल्या देशाच्या उपग्रहासह विदेशातील एकूण २० उपग्रह प्रक्षेपित करण्याचा विक्रम रचला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८०५ : इटालियन स्वातंत्र्यवीर जोसेफ मॅझिनी यांचा जन्म. (मृत्यू: १० मार्च १८७२)
१८९६ : बाबुराव पेंढारकर, मराठी चित्रपट अभिनेता.
१८८७ : ब्रिटिश जीवशास्त्रज्ञ ज्यूलियन हक्सले यांचा जन्म. (मृत्यू: १४ फेब्रुवारी १९७५)
१८९६ : नटश्रेष्ठ बाबुराव पेंढारकर यांचा जन्म.
१८९८ : पं. विनायकराव पटवर्धन शास्त्रीय गायक (मृत्यू: २३ ऑगस्ट १९७५)
१८९९ : मास्किंग टेप चे शोधक रिचर्ड गिर्ली ड्र्यू यांचा जन्म. (मृत्यू: १४ डिसेंबर १९८०)
१९०० : भारतीय स्वातंत्र्य सेनानी व राजकारणी गणेश घोष यांचा जन्मदिन.
१९०८ : महानुभाव पंथाचे अभ्यासक, विचारवंत व तत्त्वज्ञ, नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विष्णू भिकाजी तथा वि. भि. कोलते यांचा जन्म. (मृत्यू: ९ एप्रिल १९९८)
१९२३ : मुकेश चंद माथूर तथा 'मुकेश' पार्श्वगायक. तीस वर्षांच्या फिल्मी कारकिर्दीत त्यांनी १०,००० हून अधिक गीतांना आवाज दिला. ऊर्दू, पंजाबी, तमिळ, बंगाली, मराठी, गुजराथी या भाषांतही त्यांनी गाणी गायली. अनुनासिक स्वर आणि गायकीत ओतप्रोत भरलेलाअ 'दर्द' ही त्यांच्या गायनशैलीची वैशिष्ट्ये होती. (मृत्यू: २७ ऑगस्ट १९७६)
१९२७ : भारतीय-इंग्लिश इतिहासकार आणि शैक्षणिक एन्थोनी लो यांचा जन्म. (मृत्यू: १२ फेब्रुवारी २०१५)
१९३२ : आंतरराष्ट्रीय किर्ती प्राप्त केलेले चित्रपट व रंगमंच कलाकार अमरीश पुरी यांचा जन्म. (मृत्यू: १२ जानेवारी २००५ मुंबई, महाराष्ट्र)
१९३७ : वसंत रांजणे मध्यमगती गोलंदाज (मृत्यू: २२ डिसेंबर २०११)
१९८० : कीर्ती चक्र व सेना पदक सन्मानित माजी भारतीय गोरखा रेजिमेंटम अधिकारी सुनील कुमार चौधरी यांचा जन्मदिन.
१९८५ : भारतीय बास्केटबॉल संघाच्या माजी कर्णधार व बास्केटबॉल खेळाडू अनिता पॉलदुराई यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१२७६ : पोप इनोसंट पाचवा.
१४२९ : गियात अल काशी, पर्शियन अंतराळतज्ञ व गणितज्ञ.
१९१८ : इन्दर लाल रॉय पहिल्या महायुद्धातील भारतीय पायलट (जन्म: २ डिसेंबर १८९८)
१९४० : ब्लाडिमार पी. कोपेन, रशियन हवामानशास्त्रज्ञ.
१९५५ : लेगस्पिनर व गुगली गोलंदाज सदाशिव ऊर्फ सदू शिंदे यांचे निधन. (जन्म: १८ ऑगस्ट १९२३)
१९८४ : गजानन लक्ष्मण तथा ग. ल. ठोकळ साहित्यिक व प्रकाशक (जन्म:१९०९)
१९८५ : थोर भारतीय स्वतंत्र सेनानी व समाजसुधारक आणि राजकीय कार्यकर्ता तसचं, आर्य समाज व आचार्य विनोबा भावे यांच्या भूदान चळवळीचे अनुयायी मोहरसिंग राठोड यांचे निधन.
१९८८ : भारतीय बौद्ध भिक्षू, अभ्यासक, प्रवासी व लेखक भदंत आनंद कौसल्यायन यांचे निधन.
१९९३ : चित्रपट अभिनेते विष्णूपंत जोग यांचे निधन.
१९९४ : चित्रपट निर्माते व दिग्दर्शक अक्किनेरी लक्ष्मीवर प्रसाद राव ऊर्फ एल. व्ही. प्रसाद यांचे निधन. (जन्म: १७ जानेवारी १९०८)
१९९५ : हेरॉल्ड लारवूड इंग्लिश क्रिकेटपटू (जन्म: १४ नोव्हेंबर १९०४)
२००० : हिंदी भाषिक लेखक व कवी केदारनाथ अग्रवाल यांचे निधन.
२००१ : डॉ. अरुण घोष, अर्थतज्ज्ञ.
२००३ : उदय हुसेन सद्दाम हुसेन यांचा मुलगा (जन्म: १८ जून १९६५)
२००३ : कुसय हुसेन सद्दाम हुसेन यांचा मुलगा (जन्म: १७ मे १९६६)
२०१२ : रोमन कॅथोलिक चर्चचे भारतीय धर्मगुरू गिल्बर्ट ब्लेझ रेगो यांचे निधन.
२०१४ : भारतीय दिग्दर्शक आणि निर्माता रामा नारायणन यांचे निधन. (जन्म: ३ एप्रिल १९४९)

राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत







# कर्मचारी-अधिकाऱ्यांनी कामात हलगर्जीपणा केल्यास सहन करणार नाही-डॉ.कनवरीया

जालना। प्रतिनिधी

केंद्र व राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी योजनांचा लाभ सर्वसामान्य नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी प्रशासनाने अधिक तत्परतेने काम करणे आवश्यक आहे. कामात हायगय करणाऱ्या कर्मचारी व अधिकाऱ्यांची गय केली जाणार नाही, असा स्पष्ट इशारा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कृष्णकांत कनवरीया यांनी दिला.अंबड येथे आयोजित अंबड व घनसावंगी तालुक्यांच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी शिरीष बनसोडे, प्रकल्प संचालक डॉ. सुनील पठारे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी संदीप पवार, मुख्य वित्त व लेखा अधिकारी राधाकिशन राऊत, उपमुख्य कार्यकारी अधिकारी लिंबाजी बारगिरे, जिल्हा कृषी अधिकारी पी. बी. बनसवडे तसेच पद्मा मांझरे उपस्थित होते.




पंचायत समिती कार्यालयांमध्ये आयोजित बैठकीत विविध विभागांच्या कामकाजाचा आणि शासन योजनांच्या प्रगतीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. घरकुल योजना व मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाच्या कामातील प्रगतीबाबत मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी नाराजी व्यक्त करत संबंधित अधिकाऱ्यांना १५ दिवसांत सुधारणा करण्याची मुदत दिली. बैठकीत प्रधानमंत्री आवास योजना, घरकुल योजना, पंचायत विभाग, स्वच्छ भारत मिशन, उमेद अभियान, जल जीवन मिशन, आरोग्य, शिक्षण, महिला व बालविकास, कृषी, लेखा विभाग तसेच मनरेगा योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यात आला.

ग्रामीण भागातील शाळा, अंगणवाडी केंद्रे, ग्रामपंचायत कार्यालये आणि आरोग्य केंद्रांमध्ये मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याच्या सूचनाही देण्यात आल्या. तसेच जलकवच अभियानांतर्गत सर्व शासकीय कार्यालयांवर रेन वॉटर हार्वेस्टिंगची व्यवस्था उभारणे आवश्यक असल्याने आगामी १५ दिवसांत हे काम पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आले. बैठकीस अंबड गट विकास अधिकारी ज्योती कवडदेवी, घनसावंगी गट विकास अधिकारी प्रदीप कदम, सहाय्यक गट विकास अधिकारी समीर जाधव, जनसंपर्क अधिकारी भगवान तायड यांच्यासह तालुकास्तरीय विभागप्रमुख, क्षेत्रीय अधिकारी, कर्मचारी आणि ग्रामविकास अधिकारी उपस्थित होते.

> सर्व कर्मचारी व अधिकाऱ्यांनी परस्पर समन्वयाने काम करणे आवश्यक आहे. घरकुल किंवा इतर कोणत्याही प्रकरणात सकारात्मक प्रतिसाद न देणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांची दिरंगाई सहन केली जाणार नाही. असे
> डॉ. कृष्ण कांत कनवरीया म्हणाले

# आरोपीसह एक गावठी कट्टा दोन जिवंत काडतूस हस्तगत

## पाथर्डी पोलिसांची यशस्वी कारवाई



पाथर्डी। प्रतिनिधी

पाथर्डी शहर हद्दीत मंगळवारी पाथर्डी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक आनंद कोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पाथर्डी पोलीस अवैध शस्त्र बाळगणाऱ्यांची माहिती काढत असताना गोपनीय बातमीदारामार्फत पाथर्डी पोलीस ठाण्यातील रेकॉर्डवरील गुन्हेगार आरोपी नामे शिवराज उर्फ बज्या हरिश्चंद्र मरकड हा पाथर्डी धामणगाव रोडवर संशयितरित्या फिरत असताना पोलिसांना माहिती मिळाली या माहितीच्या आधारे पाथर्डी पोलिसांनी सीताफिने आरोपी शिवराज उर्फ बज्या हरिश्चंद्र मरकड याला पकडले आरोपीकडून गावठी एक गावठी पिस्टल किंमत २५००० रुपये आणि दोन जिवंत काडतूस किंमत १६०० रुपये असा एकूण २६६०० रुपये किमतीचा ऐवज जप्त करण्यात आला असून पोलीस कॉन्स्टेबल ज्ञानेश्वर इलग यांच्या फिर्यादीवरून आरोपी शिवराज उर्फ बज्या हरिश्चंद्र मरकड याविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे सदरील कारवाईत पोलीस उपनिरीक्षक विशाल लहाने पोलीस कॉन्स्टेबल सागर बुधवंत बाबासाहेब बडे इजाज सय्यद ज्ञानेश्वर इलग संजय जाधव यांच्या पथकाने केली आहे.

# मयत किरण काकडे मृत्यूप्रकरणी मुख्य आरोपींना सोडून दिले

## पीआय आनंद कोकरे यांच्यावर गंभीर आरोप!

पाथर्डी। प्रतिनिधी

पाथर्डी तालुक्यातील धामणगाव येथील रहिवासी किरण आप्पासाहेब काकडे वय ४० याचा दिनांक १७ जून २०२६ रोजी रात्री साडेआठच्या दरम्यान अज्ञात १७ ते १८ मारेकऱ्यांनी मारहाण करून खून केला सदरील गुन्हा पाथर्डी पोलीस ठाण्यात दाखल झाल्यानंतर स्थानिक गुन्हे अन्वेषण विभाग पोलिसांनी चार आरोपींना अटक केली चार आरोपींना पाथर्डी पोलिसांच्या ताब्यात दिले परंतु अन्य दहा ते बारा मुख्य आरोपी यांना पोलीस निरीक्षक आनंद कोकरे यांच्याकडे मयत किरण आप्पासाहेब काकडे यांना मारतानाचे सीसीटीव्ही फुटेज उपलब्ध असून अन्य दहा ते बारा आरोपी गुन्ह्यात नाव न घेणे व कागदोपत्री आरोपी फरार दाखवणे व आरोपींना मदत करून खुनाचा गुन्हा दडपण्याचा प्रयत्न करणे असे आरोप लेखी निवेदनात आहेत.

मयत किरण आप्पासाहेब काकडे यांच्या खुनातील सर्व आरोपींवर खुणाचा गंभीर गुन्हा दाखल करून तातडीने जेरबंद करावे अन्य फरार दहा ते बारा आरोपींना मदत केल्याप्रकरणी व गुन्हा खुणाचा गंभीर गुन्हा दडपण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी पोलीस निरीक्षक आनंद कोकरे यांना सहआरोपी करून पोलीस सेवेतून बडतर्फ करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते किसन आव्हाड यांनी निवेदनाद्वारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पोलीस महासंचालक पोलीस आयुक्त पोलीस अधीक्षक यांच्याकडे केली आली आहे अन्यथा २७ जून पासून पोलीस उपविभागीय कार्यालय शेवगाव येथे बैठक सत्याग्रह व घंटानाद आंदोलन करण्यात येणार असल्याचीही चेतावणी किसन आव्हाड यांनी दिली आहे.

मयत किरण आप्पासाहेब काकडे याला मारहाण करून खून केलेले तब्बल १७ ते १८ मुख्य आरोपी असून त्यातील केवळ चार आरोपी अटक आहेत अन्य आरोपी फरार असून त्यांना या गुन्ह्यातून वाचवण्यासाठी मोठी आर्थिक तडजोड झाल्याचा आरोप किसन आव्हाड करत असून १७ जून १८ जून २०२६ रोजीचे मयत किरण काकडे यांच्या मारहाण करून खून करतानाचे सीसीटीव्ही फुटेज व पोलीस स्टेशन मधील १८ जून चे संपूर्ण दिवस व रात्रीचे सीसीटीव्ही फुटेज जतन करण्यात यावेत व आरोपी व पोलीस स्टेशन मधील अधिकारी यांचे सीडीआर तपासण्यात यावेत यातून मयत किरण काकडे यांच्या खुनातील गुन्ह्यातील मुख्य आरोपी व सहआरोपी यांचा पर्दाफाश होण्याची संभावना असल्याची खात्री किसन आव्हाड करत आहेत.

# पीएसआय संदीप ढाकणे याची बदली: नाशिक पोलीस आयुक्त यांच्यातर्फे खातेनिहाय चौकशी करण्याची मागणी

पाथर्डी । प्रतिनिधी

पाथर्डी पोलीस ठाण्यातील अत्यंत भ्रष्ट व सटकेल पीएसआय संदीप ढाकणे याची तातडीने अहिल्यानगर जिल्ह्याबाहेर बदली करण्याची मागणी पत्रकार दादासाहेब खेडकर यांनी निवेदनाद्वारे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस पोलीस महासंचालक मुंबई विशेष पोलीस आयुक्त परिक्षेत्र नाशिक व पोलीस अधीक्षक ममुका सुदर्शन यांच्याकडे केली आहे पीएसआय संदीप ढाकणे हा पाथर्डी पोलीस ठाण्यातील सर्वात भ्रष्ट अधिकारी असून याने त्याच्या गेल्या एक ते दीड वर्षाच्या कालावधीत पाथर्डी तालुक्यातील अवैध धंद्यांना प्रोत्साहन देणे बनावट दारू बिंगो जुगार अन्य अवैध धंदे व गुन्हेगारांशी याचे आर्थिक हितसंबंध असल्याने पीएसआय संदीप ढाकणे याच्या जुडीसील मध्ये सर्वाधिक गुन्हेगारी वाढत चालल्याची आकडेवारी आहे संदीप ढाकणे पीएसआय झाल्यापासून याच्या सेवा पुस्तिकाची चौकशी करण्यात यावी सगळ्यात जास्त सामान्य नागरिकांच्या व सामाजिक कार्यकर्त्यांच्या तक्रारी पीएसआय संदीप ढाकणे याच्या विरोधात आहेत पत्रकार दादासाहेब खेडकर अमानुष मारहाण प्रकरणी अद्यापपर्यंत पीएसआय संदीप ढाकणे वर कुठलीही कारवाई झाली नसल्याने लवकरच शेवगाव पोलीस उपविभागीय कार्यालयसमोर आमरण उपोषण करणार असल्याची माहिती दादासाहेब खेडकर यांनी दिली आहे पीएसआय संदीप ढाकणे याची अहिल्यानगर जिल्ह्याबाहेर तडकाफडकी बदली करावी व त्याची खातेनिहाय चौकशी करून त्याला पोलीस सेवेतून बडतर्फ करण्यात यावे अशी निवेदनात मागणी करण्यात आली आहे.

### पीएसआय संदीप ढाकणे गुन्हेगारी आणि अवैध धंदे यांचे कनेक्शन ?

पीएसआय संदीप ढाकणे याच्या जुडिशल मध्ये सर्वात जास्त विनयभंग बलात्कार अवैध धंदे बिंगो मटका जुगार चोरी दरोडे लुटमार तसेच परस्पर फिर्यादी घेऊन खोटे गुन्हे दाखल करून लाखो रुपयांची आर्थिक तडजोड करणे पाथर्डी तालुक्यातील दोन-तीन खुनाच्या गुन्ह्यात पीएसआय संदीप ढाकणे याने आरोपींना मदत करण्यासाठी लाखो रुपयांची डील केली असल्याचा आरोप देखील आहे यामुळे पीएसआय संदीप ढाकणे याची नाशिक पोलीस परिक्षेत्र महासंचालक यांच्यामार्फत खातेनिहाय चौकशी करण्यात यावी व संदीप ढाकणे याचे गुन्हेगारांचे व अवैध धंद्यावाल्यांशी थेट संबंध असल्याने याचे सीडीआर तपासण्यात यावेत व याचे बँक खाते तपासून पोलीस सेवेतील पगाराशिवाय अन्य आर्थिक व्यवहार कुठल्या मार्गाने केले याची सुद्धा सखोल चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

# कुरेशी मोहल्ल्यातील गोवंश कत्तल प्रकरणी ८ जणांविरुद्ध गुन्हा दाखल

अंबड। प्रतिनिधी

अंबड शहरातील कुरेशी मोहल्ला परिसरात गोवंशीय जनावरांची अवैध कत्तल करुन पुरावे नष्ट केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला असून, या प्रकरणी अंबड पोलिसांनी ८ जणांविरुद्ध विविध कायद्यांअंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. यासंदर्भात पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार दि. १९ जून रोजी दुपारी अंबड ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष घोडके यांना एका गोपनीय माहितीदारामार्फत व्हॉट्सॲपवर एक व्हिडिओ प्राप्त झाला. या व्हिडिओमध्ये काही व्यक्ती एका पत्र्याच्या शेडमध्ये गोवंशीय गाय व वासरांची कत्तल करीत असल्याचे दिसून आले. त्यानंतर पोलिसांनी तातडीने या प्रकरणाची पडताळणी सुरु केली. तपासादरम्यान संबंधित शेड हे समद अब्दुल रज्जाक कुरेशी यांच्या मालकीचे असल्याचे निष्पन्न झाले. त्यावरुन पोलिसांचे पथक घटनास्थळी पोहोचले असता तेथे कोणतेही जनावर अथवा संशयित आढळून आले नाहीत. मात्र, व्हिडिओतील व्यक्तींची ओळख पटविण्यात पोलिसांना यश आले.

या प्रकरणात समद अब्दुल रज्जाक कुरेशी,इम्रान मोईनुद्दीन कुरेशी, सादिक मोईनुद्दीन कुरेशी, अनीस अहमद कुरेशी, मगदूम हनीफ कुरेशी, अतिफ लतीफ कुरेशी, असलम रज्जाक कुरेशी आणि अयान असलम कुरेशी (सर्व रा. कुरेशी मोहल्ला, अंबड) यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पोलिसांच्या फिर्यादीनुसार आरोपींनी अंदाजे ४ ते ५ दिवसांपुर्वी आर्थिक फायद्यासाठी अवैधरित्या गोवंशीय जनावरांची कत्तल केली. त्यानंतर पुरावे नष्ट करण्याच्या उद्देशाने जनावरांचे अवशेष व मांसाची विल्हेवाट लावल्याचा आरोप आहे. या प्रकारातून संघटित स्वरुपातील अवैध कत्तल व्यवसाय सुरु असल्याचा संशयही पोलिसांनी व्यक्त केला आहे.या प्रकरणी पोहेकॉ दिपक चव्हाण यांच्या फिर्यादीवरुन अंबड पोलिस ठाण्यात ८ जणांविरुद्ध महाराष्ट्र पशुसंवर्धन अधिनियम १९७६ मधील कलम ५, ५-अ, ५-ब, ५-क, ९, प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम १९६० चे कलम ११ तसेच भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम २३८ (अ) व ३ (५) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून, या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक आदिनाथ ढाकणे हे करीत आहेत.

# पहिल्याच पावसात सोनलनगर पाण्यामध्ये बुडलं

## नैसर्गिक आपत्तीमध्ये आयुक्तांना अपयश



जालना। प्रतिनिधी

जालना शहरातील सोनल नगर परिसरात आज सकाळी पहिल्याच झालेल्या पावसामध्ये सोनाली नगर पाण्यात डुबल याप्रकरणी महानगरपालिका चे आयुक्त यांना अपयश आलं आहे. आणि महानगरपालिका नापास झाली असं चित्र बघायला मिळेल.पहिल्या पावसानेच नागरी सुविधांच्या दाव्यांची पोलखोल झाली. परिसरातील नाल्यांची नियमित स्वच्छता न झाल्याने पावसाचे पाणी नाल्यातून वाहून न जाता रस्त्यावर तुंबले. त्यामुळे अनेक ठिकाणी रस्त्यांना तळ्याचे स्वरूप आले असून नागरिकांना मोठ्या समस्येला सामोरे जावे लागले. तुंबलेल्या पाण्याचा निचरा न झाल्याने ते थेट नागरिकांच्या घरांमध्ये शिरले. महिलां व ज्येष्ठ नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागला. पहिल्याच पावसात अशी परिस्थिती निर्माण झाल्याने नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण आहे.

स्थानिक नागरिकांनी अनेक वेळा नाल्यांची स्वच्छता व दुरुस्ती करण्याची मागणी केली होती.तसेच या सोनल नगर मध्ये ज्या गुत्तेदाराने काम केले आहे ते चुकीच्या पद्धतीने केले असल्याचे निवेदन महानगर पालिका प्रशासनास वेळोवेळी देऊन सुद्धा प्रशासनाने त्याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. पावसाळ्याच्या सुरुवातीलाच ही अवस्था निर्माण झाल्याने पुढील काळात मुसळधार पाऊस झाल्यास परिस्थिती आणखी गंभीर होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.त्यामुळे नागरिकांनी तातडीने नाल्यांची स्वच्छता करून पावसाच्या पाण्याचा योग्य निचरा करण्याची मागणी प्रशासनाकडे केली आहे. . प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन त्वरित उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा सोनल नगरवासीयांनी व्यक्त केली . नैसर्गिक आपत्तीमध्ये महानगरपालिका आयुक्त नापास झाल्याचे दिसून येत आहे.

कोट - आज सकाळी पाऊस झालेल्या पावसामुळे सोनलनगर मधील रस्त्यावर साचलेल्या पाण्याचे नागरिकांनी फोटो पाठविल्यानंतर त्याची मी तत्काळ दखल घेऊन महानगर पालिका कर्मचाऱ्यांना बोलवून नाली साफ करून घेण्यात आली त्यामुळे बऱ्याच अंशी पाणी कमी झाले आहे.

### जाहीर प्रगटन

**मा. श्री. व्ही. बी. साळुंके सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज ७८८/२०२६**

**ॲड.ए. एच. काळे**

**राधाबाई व इतर विरुध्द निरंक**

अर्जदार : १. राधाबाई भ्र. किसनराव काळे, वय-७७ वर्षे, धंदा-घरकाम, रा. नेकनुर ता. जि. बीड २. प्रल्हाद उर्फ प्रलाध पि. किसनराव काळे, वय-५८ वर्षे, धंदा-शेती, रा. सदर ३. त्रिंबक पि. किसन काळे, वय ५४ वर्षे, धंदा शेती, रा. सदर ४. कमल भ्र. अण्णासाहेब घोडके, वय ५९ वर्षे, धंदा शेती, रा. लोळदगांव ता. जि. बीड

गैरअर्जदार :- निरंक (अर्जदार हे भारतीय आहेत) मागणी अर्ज:- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत किसन पि. रंगनाथ काळे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे. ज्याअर्थी मयत किसन पि. रंगनाथ काळे यांचा मृत्यु दिनांक २८.०६.१९९३ रोजी नेकनुर, ता. जि. बीड येथे झालेला असुन अर्जदार क १ ही मयताची पत्नी असून अर्जदार क २ व ३ मयताचे मुले असून अर्जदार क. ४ ही मयताची विवाहित मुलगी आहे. वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरह मयत किसन पि. रंगनाथ काळे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २३ जुन २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. २२ जुलै २०२६

स्वाक्षरित
क. लिपीक

आदेशावरुन
स्वाक्षरित
अधिक्षक
दिवाणी न्यायालय व.स्तर, बीड.

### वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**मा.वसंत एस यादव साहेब ७ सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर बीड ता.जि.बीड यांचे न्यायालयात**

**(मार्फत ॲड. एम. आर. उबाळे बीड)**

**किरकोळ दिवाणी अर्ज कमांक: ७९९/२०२६ शौकत व इतर विरूध्द- निरंक**

अर्जदार : १) शौकत शब्बीर पठाण वय-६२ वर्षे, धंदा-शेती, रा. खामगांव ता.जि.बीड २) सादिका अहेमद शेख वय-७५ वर्षे, धंदा-घरकाम रा. आहेर वाहेगांव ता. गेवराई जि.बीड ३) हमिदाबी शब्बीरखाँ पठाण वय-७१ वर्षे, धंदा-घरकाम रा. खामगांव ता.जि.बीड ज्याअर्थी मयत नामे शब्बीरखों पि. महेबुबखाॅ पठाण रा. खामगांव ता.जि. बीड हे दि. ३०.०५.२०२३ रोजी मौजे खामगांव ता.जि. बीड येथे मयत झाले आहेत १) हे की, अर्जदार क्रं. १ हा मयताचा मुलगा आहे. तसेच अर्जदार क्रं. २ ही मयताची विवाहित मुलगी आहे. तसेच अर्जदार क्रं. ३ ही मयताची पत्नी आहे. मयत नामे शब्बीरखों पि. महेबुबखौं पठाण, रा. खामगांव ता. जि. बीड हे दिनांक ३०-०५-२०२३ रोजी खामगांव ता.जि. बीड येथे मयत झालेले आहेत,

शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे. त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे शब्बीरखाॅ पि. महेबुबखाॅ पठाण रा. खामगांव ता.जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. आज ०९/०६/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख : २४.०७.२०२६

स्वाक्षरित
क. लिपीक

आदेशावरुन
स्वाक्षरित
अधिक्षक
दिवाणी न्यायालय व.स्तर, बीड.

### जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती व्ही.पी.पाटील, दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क. ८७२/२०२६**

**ॲड.बी.बी.घुमरे**

**महादेव पि. बाजीराव सानप व इतर वि. निरंक**

अर्जदार : महादेव पि. बाजीराव सानप, वय ३७ वर्षे, धंदा-शेती, रा.सानपवाडी पो. कळसंबर ता. जि. बीड १.जाई भ्र. कांतीलाल मुंडे, वय ३८ वर्षे, धंदा-घरकाम, रा. निवडंगवाडी पो. येळंबघाट ता.जि.बीड २.

विरुध्द गैरअर्जदार निरंक

प्रकरणः- भारतीय वारसा कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. ज्याअर्थी अर्जदार यांनी सुग्रणबाई भ्र. बाजीराव सानप यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. मयत सुग्रणबाई भ्र. बाजीराव सानप हे दिनांक १८/०३/२०१६ रोजी राहत्या घरी रा.सानपवाडी पो. कळसंबर ता.जि.बीड येथे मयत झालेले आहेत. अर्जदार क. १ हा मयताचा मुलगा असून अर्जदार क. २ ही मयताची विवाहीत मुलगी आहे. मयतास अर्जदारांशिवाय ईतर कोणीही वारस नाहीत. अर्जदारांचे असेही म्हणणे आहे की, शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणुन सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे सदरहु मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तीस दिवसाच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु न्यायालय सदरहु अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु, मयत नामे सुग्रणबाई भ्र. बाजीराव सानप रा. सानपवाडी पो. कळसंबर ता. जि. बीड यांचे अर्जदार हे कायदेशीर वारस म्हणुन घोषीत करुन अर्जदारास वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पुढील तारीख ०६/०८/२०२६. आज दिनांक १८/०६/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिले.

स्वाक्षरित
स्वाक्षरित / -
कनिष्ठ लिपीक

आदेशावरुन
स्वाक्षरित
अधिक्षक
दिवाणी न्यायालय व.स्तर, बीड.

# निर्मल सीड्स कंपनीच्या नावाने बनावट बियाण्यांची विक्री

## धामणगावातील कृषी सेवा केंद्रावर भरारी पथकाची धडक कारवाई

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील धामणगाव येथील मे. शिवशंभो कृषी सेवा केंद्रावर कृषी विभागाच्या भरारी पथकाने धडक कारवाई करत निर्मल सीड्स प्रा. लि. कंपनीच्या नावाने बनावट उडीद बियाण्यांची विक्री होत असल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आणला आहे. या प्रकरणी दुकानाचे मालक भूषण बेलाजी बोराडे यांच्याविरुद्ध विविध कायद्यांतर्गत कायदेशीर फिर्याद दाखल करण्यात आली आहे.

कृषी विभागाच्या तपासणीत तुलसी सीड्स प्रा. लि. कंपनीच्या तुलसी-१४४ इऋ-खख कापूस वाणाची नऊ पाकिटे तसेच निर्मल सीड्स प्रा. लि. कंपनीच्या उडीद वाण छणङ-७ (विश्वास) च्या चार पोत्यांमधील २२ बॅग आढळून आल्या. संबंधित बियाण्यांच्या पाकिटावरील साथी टठ कोड स्कॅन केल्यानंतर 'सीड ट्रेसिबिलिटी' उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे संबंधित बियाण्यांना तत्काळ विक्री बंद आदेश देण्यात आले.

**शेतकऱ्याकडूनही बियाणे जप्त**

तपासादरम्यान बिल क्रमांक १००९१, दिनांक २६ मे २०२६ नुसार धीरडी येथील शेतकरी भगवान जाधव यांना निर्मल सीड्स कंपनीचे दीड पाकीट विक्री केल्याचे समोर आले. भरारी पथकाने संबंधित बियाणे शेतकऱ्याकडून हस्तगत केले.

**कंपनी प्रतिनिधीनेच सांगितला बनावटपणाचा पर्दाफाश**

निर्मल सीड्स प्रा. लि.चे यू.बी. मॅनेजर




श्री. बळे यांनी तपास पथकास दिलेल्या माहितीनुसार मूळ बियाण्यांच्या पाकिटावर साथी पोर्टलवरील ट्रेसिबिलिटी उपलब्ध होते, तर बनावट पाकिटांवर ती उपलब्ध नव्हती. तसेच पॅकिंगवरील इंग्रजी अक्षरांची रचना, उत्पादकाचा पत्ता व इतर तपशीलांमध्ये स्पष्ट तफावत आढळून आली. त्यामुळे विक्रीस ठेवलेले उडीद वाण छणङ-७ (विश्वास) हे बनावट असल्याचे निष्पन्न झाले.

**या कायद्यांचे उल्लंघन**

सदर प्रकरणात बियाणे अधिनियम १९६६ मधील कलम ६ (अ), ६ (ब), ७ (अ), ७ (क), ९ व १०, बियाणे नियंत्रण आदेश १९८३ मधील कलम ३ व १५, अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५ मधील कलम ३ व ७ तसेच भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ३१८ (२) चे उल्लंघन झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी संबंधित विक्रेता व बियाणा पुरवठा करणाऱ्या इतर संबंधित व्यक्तींविरुद्ध पुढील कायदेशीर कारवाई सुरू असून, बनावट बियाणे विक्रेत्यांवर कठोर कारवाईचा इशारा कृषी विभागाने दिला आहे.

### बिनापरवाना व्यवसाय, पुरावे नष्ट करण्याचाही प्रयत्न

पंचनाम्यातून भूषण बोराडे यांच्याकडे बियाणे विक्रीचा वैध परवाना नसल्याचे स्पष्ट झाले. तपासादरम्यान त्यांनी बनावट बियाण्यांचे पुरावे नष्ट करण्याचाही प्रयत्न केल्याचे समोर आले. विक्री अभिलेखे, साठा पुस्तक, खरेदी बिले व इतर आवश्यक कागदपत्रेही अपूर्ण असल्याचे आढळले.

### शेतकऱ्यांच्या आर्थिक फसवणुकीचा गंभीर प्रकार

नामांकित कंपन्यांच्या पॅकिंगची हुबेहूब नक्कल करून बनावट बियाण्यांची विक्री केल्यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक फसवणूक होण्याची तसेच शेती उत्पादनावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता कृषी विभागाने व्यक्त केली आहे.

# चोरीस गेलेली ६८ हजारांची रोकड शिवाजीनगर पोलिसांकडून परत

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यात पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कावत यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस ठाण्यात जप्त असलेला मुद्देमाल मूळ मालकांना परत मिळवून देण्यासाठी विशेष मोहीम राबवली जात आहे. याच मोहिमेअंतर्गत शिवाजीनगर पोलिसांनी २०२३ मधील एका घरफोडीच्या गुन्ह्यातील ६८ हजार रुपयांची रोख रक्कम कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून फिर्यादीला सन्मानपूर्वक परत केली आहे.



पर्णकुटी कॉलनी, भक्ती कन्स्ट्रक्शन (बीड) येथील रहिवासी असलेले निवृत्त ज्येष्ठ नागरिक श्री. शेषराव हरिभाऊ हिवराळे (वय ६५) यांच्या घरी २०२३ मध्ये घरफोडी झाली होती. याप्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा (गु.र.नं. ३२३/२०२३) दाखल करण्यात आला होता. तत्कालीन पोलिसांनी या गुन्ह्याचा तपास करून आरोपी राम बन्सी नवले (रा. आहेर धानोरा, जि. बीड) याला अटक केली होती आणि त्याच्याकडून चोरीस गेलेली ६८,०००/- रुपयांची रोख रक्कम जप्त केली होती.

**वरिष्ठांच्या सूचनेवरून तत्पर कारवाई**

पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कावत यांनी जप्त मुद्देमाल परत करण्याबाबत विशेष मोहीम आखून सर्व पोलिसांना पाठपुरावा करण्याच्या सक्त सूचना दिल्या होत्या. त्यानुसार, अप्पर पोलीस ◀◀ पान ३ वर

# घुले हत्याप्रकरणी एसआयटीची स्थापना, एलसीबी चे कर्मचारी पथकात

बीड । प्रतिनिधी

केज पोलीस ठाण्याच्या हद्दीत दाखल झालेल्या एका गंभीर गुन्ह्याचा सखोल तपास करण्यासाठी बीडच्या पोलीस अधीक्षकांनी विशेष तपास पथक स्थापना केली आहे. याप्रकरणी तातडीने कारवाई करून अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत

केज पोलीस ठाण्यात २१ जून २०२६ रोजी रात्री १०:३८ वाजता गुन्हा दाखल करण्यात आला होता (गु.र.नं. ३९२/२०२६). सदर गुन्ह्याचे गांभीर्य आणि व्याप्ती लक्षात घेता, याचा तपास आता विशेष पथकाद्वारे केला जाणार आहे. विलास फुले या व्यवसायिकाची हत्या करण्यात आली या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी पोलीस अधीक्षकांनी एसआयटी ची स्थापना केली आहेया विशेष तपास पथक प्रमुख म्हणून केज उपविभागाचे सहायक पोलीस अधीक्षक व्यंकटराम यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली खालील अधिकारी आणि अंमलदार या प्रकरणाचा तपास

सपोनि धनराज रूपचंद जारवाल , पोउपनि श्रीराम रामदास खटावकर , आनंद विष्णू मस्के जफर अझर पठाण ,मारुती देवीदास कांबळे, दिपक उत्तम खांडेकर या एलसीबी मधील कर्मचाऱ्यांचा समावेश आहे

विशेष तपास पथकाच्या प्रमुखांना गुन्हेशी संबंधित सर्व कागदपत्रे केज पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्यांकडून तत्काळ हस्तांतरित करून घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच, तपासासाठी आवश्यकतेनुसार अधिक मनुष्यबळ उपलब्ध करून दिले जाणार असून, या प्रकरणातील तपासाचा प्रगती अहवाल वेळोवेळी सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. बीडच्या पोलीस अधीक्षकांनी या आदेशाद्वारे तपासाला गती दिली आहे.



**बीड : शिवसेना जिल्हाप्रमुख चंद्रकांत नवले यांनी बीडच्या वेलनेस हॉस्पिटलमध्ये जाऊन मराठा सेवक युवराज मस्के यांची भेट घेतली व त्यांच्या आरोग्याची विचारपूस केली.यावेळी संजय गोडसे , जयदत्त थोटे , मुक्ताराम आहेर , गणेशराव मोरे व इतर सहकारी उपस्थित होते.**

# गेवराईतील सराईत गुंडाला जिल्हाधिकाऱ्यांचा दणका

## एमपीडीए अंतर्गत कारागृहात रवानगी

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस प्रशासनाने कडक पावले उचलली आहेत. याच मोहिमेचा भाग म्हणून गेवराई तालुक्यातील एका धोकादायक गुंडावर 'एमपीडीए' कायद्यान्वये कारवाई करत त्याला हर्मुल कारागृहात (छत्रपती संभाजीनगर) स्थानबद्ध करण्यात आले आहे.

पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉवत यांनी पदभार स्वीकारल्यापासून जिल्ह्यातील गुन्हेगारी, गुंडगिरी आणि वाळू माफियांचे उच्चाटन करण्यासाठी विशेष मोहीम हाती घेतली आहे. या मोहिमेला जिल्हाधिकारी श्री. विवेक जॉन्सन यांची भक्कम साथ लाभली आहे. या पार्श्वभूमीवर, तलवडा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सिद्धार्थ शहादेव पटेकर (वय ४२, रा. ठाकर आडगाव, ता. गेवराई) या गुंडाविरुद्ध एमपीडीए कायद्यांतर्गत कारवाईचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. पटेकर याच्यावर खुनाचा प्रयत्न, मारहाण, शिवीगाळ, जिवे मारण्याची धमकी आणि जमावबंदीच्या आदेशांचे उल्लंघन अशा गंभीर स्वरूपाचे ५ गुन्हे पोलीस दप्तरी दाखल आहेत. यापूर्वीही त्याच्यावर प्रतिबंधक कारवाई करूनही वर्तनात सुधारणा झाली नव्हती.



जिल्हादंडाधिकारी विवेक जॉन्सन यांनी या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन २३ जून २०२६ रोजी पटेकर याला स्थानबद्ध करण्याचे आदेश दिले होते. या आदेशाची त्वरित अंमलबजावणी करत पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉवत यांच्या मार्गदर्शनाखाली तलवडा पोलीस आणि स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने २३ जून रोजी रात्री १९:५६ वाजता आरोपीला ताब्यात घेतले आणि २४ जून रोजी पहाटे १:३९ वाजता त्याला हर्मुल कारागृहात रवानगी केली.

आगामी काळात अवैध वाळू उपसा, गुटका विक्री, जीवनावश्यक वस्तूंचा काळाबाजार, जातीय तेढ निर्माण करणारे समाजकंटक आणि खंडणी बहाद्दरांवर एमपीडीए व मोक्का (चउजउ-) कायद्याअंतर्गत कठोर कारवाई केली जाईल, असा सज्जड इशारा पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉवत यांनी दिला आहे. सदर कामगिरी पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अप्पर पोलीस अधीक्षक समीर शेख, उपविभागीय पोलीस अधिकारी . अनिल कटके व स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक . शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि मनोज निलंगेकर आणि त्यांच्या पथकाने पार पाडली.

# विलास घुले हत्या प्रकरणातील सर्व आरोपींना तातडीने अटक करून कठोर कारवाई करावी!

## अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेची मागणी

बीड । प्रतिनिधी

केज तालुक्यातील टाकळी परिसरात असलेल्या हॉटेल गावकरीचे मालक विलास घुले हे त्यांचा मित्र उमेश माने याला जमावाकडून मारहाण होत असल्याची माहिती मिळाल्यानंतर त्याला वाचविण्यासाठी गेले होते. यावेळी त्यांच्या पोटात चाकूचे वार करून त्यांची हत्या करण्यात आली. या प्रकरणात सहभागी असलेल्या सर्व आरोपींना तातडीने अटक करून त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद बीड जिल्ह्याच्यावतीने करण्यात आली आहे.

याबाबत प्रशासनास दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, विलास घुले हे त्यांचा मित्र उमेश माने याला जमावाकडून मारहाण होत असल्याची माहिती मिळाल्यानंतर त्याला वाचण्यासाठी गेले होते त्यावेळी समर्थ हॉटेल समोर झालेल्या वादातून त्यांच्या पोटात चाकूचे वार करण्यात आले. जखमी अवस्थेत घुले यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. पोलिसांनी आतापर्यंत नऊ आरोपींपैकी सहा जणांना अटक केली आहे. इतर आरोपी अद्याप फरार आहेत. विलास घुले हत्या प्रकरणातील सर्व आरोपींना तातडीने अटक करून त्यांच्यावर कायदेशीर कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने करण्यात आली असून आरोपींना तात्काळ अटक न केल्यास समता परिषदेच्या वतीने रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन केले जाईल असा इशारा समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस तथा सिनेट सदस्य ड. सुभाष राऊत, समता परिषदेचे बीड जिल्हाध्यक्ष निखिल शिंदे, जिल्हा कार्याध्यक्ष अविनाश उगले, शहराध्यक्ष नितीन राऊत, नितीन साखरे, संतोष रासवे,बापू गाडेकर, दिगंबर नाईकनवरे, सावता काळे, जगन खेत्री, दत्ता बोडखे, कृष्णा शिंदे, मुकुंद शिनगारे, सचिन राऊत, दत्ता गोंदणे, शितलदास अडसुळे, धनंजय काळे आदींच्यावतीने देण्यात आला आहे.

# मातोश्री पाणंद रस्ते योजनेसह प्रलंबित देयकांबाबत आ.धस यांची मंत्री भरतशेठ गोगावले यांच्याकडे मागणी

आष्टी । प्रतिनिधी

रोजगार हमी योजना व फलोत्पादन मंत्री मा. भरतशेठ गोगावले यांची आष्टी विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुरेश धस यांनी भेट घेऊन मतदारसंघातील विविध विकासकामे व रोजगार हमी योजनेअंतर्गत प्रलंबित असलेल्या प्रश्नांबाबत सविस्तर चर्चा केली.

यावेळी आमदार धस यांनी रोजगार हमी योजनेअंतर्गत राबविण्यात येणारी मातोश्री पाणंद रस्ते योजना ग्रामीण भागासाठी अत्यंत उपयुक्त ठरत असल्याचे सांगत, या योजनेतून हजारो किलोमीटर वस्ती रस्ते व शेतरस्त्यांची कामे सुरू असल्याची माहिती दिली. मात्र, या कामांची कुशल देयके व राज्य रोजगार हमी निधी प्रलंबित असल्याने



संबंधित निधी तातडीने उपलब्ध करून देण्याची मागणी त्यांनी केली.

तसेच जलसिंचन विहीर, शेततळे, गायगोठा, शेळीपालन शेड यांसारख्या वैयक्तिक लाभाच्या कामांवरील मर्यादांमुळे अनेक शेतकऱ्यांची कामे पूर्ण होऊनही देयके रखडल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. या प्रकरणी त्वरित निर्णय घेऊन शेतकऱ्यांना न्याय देण्याची विनंतीही त्यांनी मंत्री महोदयांकडे केली.

याशिवाय रोजगार हमी योजनेतील प्रलंबित कुशल देयके तातडीने अदा करावीत तसेच रोजगार सेवक, ग्रामसेवक व संबंधित यंत्रणांच्या कामकाजात येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याची मागणीही आमदार धस यांनी केली. शेतकरी, कामगार व ग्रामीण भागातील नागरिकांच्या विविध प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी आपण सातत्याने पाठपुरावा करत असून, या सर्व प्रलंबित विषयांवर लवकरच सकारात्मक कार्यवाही होईल, असा विश्वास आमदार सुरेश धस यांनी व्यक्त केला.


# लोणी-सांवगी उपसा जलसिंचन योजनेचे १५ वर्षांत ९५ % टक्के काम पूर्ण

## गोदावरी नदीचे वाहुन जाणारे पाणी यंदाच्या पावसाळ्यात तरी माजलगाव धरणात येईल का?

**ज्योतीराम पांढरपोटे । माजलगाव**

एखाद्या स्वप्नाचं आयुष्य किती असावं? माजलगावकरांसाठी हे स्वप्न गेली १५ वर्षं डोळ्यासमोर उभं आहे, पण ते सत्यात उतरताना दिसत नाहीये. गोदावरीचं ओसंडून वाहणारं अतिरिक्त पाणी आपल्या धरणात येईल, धरणाची पातळी वाढेल आणि पिढ्यानपिढ्यांचा दुष्काळ कायमचा मिटेल, या आशेवर तालुक्यातील हजारो डोळे पाणावले आहेत.लोणी सावंगी उपसा जलसिंचन योजना ही केवळ एक तांत्रिक योजना नसून, माजलगावच्या दुष्काळमुक्तीची ती लाइफलाइन आहे. मात्र, दुर्दैवाने मागील दीड दशकापासून या योजनेला प्रशासकीय दिरंगाई आणि कासवगती कामाचं ग्रहण लागलं आहे.

दरवर्षी पावसाळा जवळ आला की हालचालींना वेग येतो, चाचणीचे दावे केले जातात, पण पाऊस ओसरला की पुन्हा 'ये रे माझ्या मागल्या' अशी परिस्थिती ओढवते. सादोळा परिसरातील लोणी सावंगी बंधाऱ्यावरून गोदावरी नदीचं पाणी माजलगाव धरणात वळवण्याचं हे शिवधनुष्य प्रशासनानं उचललं खरं,पण ते पंधरा वर्षांनंतरही पेलता आलेलं नाही. ◀◀ पान ३ वर




# अवैध वाळू वाहतूक करणारा ट्रॅक्टर जप्त

**गेवराई । प्रतिनिधी**

अवैध धंद्यांविरुद्ध सुरू असलेल्या धडक मोहिमेअंतर्गत गेवराई पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. सिंदफणा नदीपात्रातून बेकायदेशीरपणे वाळू उपसा करून वाहतूक करणारा ट्रॅक्टर आणि ट्रॉली असा एकूण ७,५०,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक नवनती कॉंवत यांनी अवैध धंद्यांवर कडक कारवाई करण्याचे आदेश दिले होते. या आदेशाचे पालन करत गेवराई पोलिसांनी विशेष पथक तयार केले होते. २४ जून २०२६ रोजी रात्री १२:२० च्या सुमारास मौजे टाकळगाव शिवारातील सिंदफणा नदीपात्रातील बंधाऱ्याजवळ पोलिसांनी अचानक छापा टाकला. यावेळी एका ट्रॅक्टर ट्रॉलीमध्ये वाळू भरली जात असल्याचे आढळून आले.



जप्त मुद्देमाल: न्यु हॉलंड कंपनीचा विना क्रमांकाचा ट्रॅक्टर आणि ट्रॉली.

एकूण किंमत: ७,५०,००० रुपये.

पोलीस कारवाई: याप्रकरणी सरकारतर्फे फिर्याद नोंदवून संबंधित आरोपीविरुद्ध गेवराई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक नवनती कॉंवत (बीड), अपर पोलीस अधीक्षक समीर शेख (बीड) आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल कटके यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या मोहिमेत पोलीस निरीक्षक किशोर पवार, कल्याण राठोड, गोरक्ष डोके आणि जितेंद्र ओव्हाळ यांनी सहभाग घेतला होता.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26